अपूर्वाई

– पु. ल. देशपांडे

प्रास्ताविक - पु. ल. देशपांडे यांचे 'अपूर्वाई' हे प्रवासवर्णन १९६० साली प्रसिद्ध झाले. या ग्रंथाच्या चौदा आवृत्त्या (जून ९७ पर्यंत) निघाल्या आहेत. पु. लं. नी आयुष्यात प्रवासवर्णन आणि आत्मचरित्र लिहायचे नाही असे ठरविले होते परंतु या पुस्तकात दोन्ही संकल्प मोडले गेले आहे. प्रवासवर्णन ह्या गोष्टीची प्रत्यक्ष प्रवासापेक्षाही पु. लं. नी अधिक धास्ती घेतली आहेत. 'अपूर्वाई' मध्ये प्रवासाचे वर्णन नसून प्रवासात असलेल्या माझेच वर्णन अधिक आहे, अशी कबूली स्वत: पु. लं. नी दिली आहे. पाचव्या आवृत्तीच्या निमित्ताने पु. ल. म्हणतात, "प्रवासवर्णने ही प्रतिबिंबे असतात. तसे पाहिले तर सारे ललित साहित्य जीवनाच्या प्रवासात वेगवेगळ्या वातावरणात वाढलेल्या संवेदनाशील लेखकांच्या मनात उमटणाऱ्या प्रतिबिंबातूनच जन्म घेत असते. मी हा प्रवास केला त्याच काळात ह्या देशांचा प्रवास करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या लेखकाने ह्याच यात्रेची कहाणी निराळ्या रीतीने सांगितली असती." आता युरोपचा प्रवास ही अपूर्वाई राहिलेली नाही. 'अपूर्वाई'तल्या स्थळांविषयींच्या माहितीपेक्षा वाचकाला रुचते ती लेखकाला भासलेली अपूर्वाई असाच अर्थ पु. ल. घेतात.

पु. ल. इंग्लंडला गेले. तेथील विविध शहरांना त्यांनी भेटी दिल्या, नाटके पाहिली, जर्मनीला गेले, पॅरीसला गेले, तेथील जीवन दर्शन पाहिले. 'अपूर्वाई' हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन वाटत नाही, ते ललितलेखन वाटते. पु. लं. चे 'अपूर्वाई'तील लेखन रुक्ष वाटत नाही. वाचकाला माहिती सांगतात, गुंतवून ठेवतात, हसवितात अन् विचार करायला लावतात ही त्यांची शैली असल्यामुळे 'अपूर्वाई'ला अपूर्व यश लाभले आहे, हे मान्य करावे लागते.

'प्रवासवर्णन' हा मराठीतला साहित्यप्रकार आधुनिक काळात निर्माण झाला आहे. मात्र प्रवासवर्णनपर लेखनाची परंपरा प्राचीन वाङ्मयात आढळते. विशेषत: 'लीळाचरित्र' या ग्रंथात तसेच बखर वाङ्मयात प्रवासवर्णनपर लेखनाची परंपरा आढळते. प्रवासाचे अनुभव शब्दबध्द करण्याचा पहिला मान वसईचे गोविंद बाबाजी जोशी

पु. ल. देशपांडे

(१) परदेशगमनाची तयारी - पु. लं. चा हा परदेश दौरा पहिलाच असल्यामुळे पु. लं. ना सर्व तयारीसाठी तत्पर राहावे लागले. टाय बांधण्यापासून बुटाच्या गाठीपर्यंत शिकवण्यासाठी आणि रीतिरिवाजांचा परिचय करून देण्यासाठी पु. लं. च्या कुटुंबियांनी आणि मित्रांनी बौध्दिके घेणे सुरू केले. 'परदेशी कसे वागावे' याविषयी पु. लं. चे प्रशिक्षण झाले. इंग्रजी हवेला मानवेल असा बूट तयार करवून घेतला. बूट तयार करवून घेताना पु. लं. ना ज्या मानसिक त्रासातून जावे लागले तीच गत सूट शिवताना झाली. सूटाच्या 'ट्रायल' मधून निघताना पु. लं. च्या नाकीनव आले. परदेशच्या प्रवासात पु. लं. निरुत्साही करणारा शिंपीच होता. पु. लं. ना एकदाचा सूट मिळाला. सूटात पु. लं. चे पोट, वाकडे खांदे झाकले जात होते. पु. लं. घरी आरशासमोर स्वत:ला सूटात न्याहाळत होते. पु. लं. ना निरोप देण्याच्या निमित्ताने बरेच लोक सूट पाहायला येत होते.

(२) प्रवासाची धाकधुक - परदेश दौऱ्याची तारीख जशी जशी जवळ येत होती तशी तशी पु. लं. ची धाकधुकी वाढत होती. विमानातून जायचे म्हणजे चव्वेचाळीस पौंडांपेक्षा जास्त सामान नेता येत नाही हे पु. लं. ना कळले तेव्हापासून पु. लं. ची झोप उडाली. चव्वेचाळीस पौंडमध्ये काय काय बसेल याचा पु. ल. विचार करू लागले. पु. लं. चा एक सुटच चव्वेचाळी पौंडाचा भरण्याइतपत वजनाचा होता. अंगावरचे कपडे धरत नाही असे कळल्यामुळे पु. ल. चार पाच शर्ट घालण्याचे ठरवू शकले असते पण ते अवघड होते. पु. लं. सोबत त्यांची पत्नी असल्यामुळे पु. लं. च्या पत्नीचे पातळ आणि इतर सामानही घ्यावे लागणार होते. इंग्लंडला जाताना सोबत किती पौंड नेता येतात याविषयी पु. लं. च्या मनात संभ्रम होता. इव्हन इंग्लंडमध्ये हमाली किती द्यायची? तिथे हमाल असतो का? असे अनेक प्रश्न पु. लं. ना भेडसावत होते.

(३) विमान कंपनीची कचेरी - लंडनचे तिकीट कसे मागायचे हा पु. लं. समोर चिमुकला पेच होता. इंटरनॅशनल एअरलाइन्सच्या गुळगुळीत आणि चकचकीत कचेरीत लंडनचे तिकीट काढताना पु. ल. धास्तावले होते. मुंबईतल्या उकाड्यामुळे पु. ल. लेंगा आणि मलमली सदरा घालून कचेरीत गेले. तिथल्या अद्ययावत वातावरणात पु. ल. 'विदाऊट

Scanned by CamScanner

आपल्याला कॉलऱ्याचे इंजेक्शन देतील की कुत्र्याचे देतील, याची भीती पु. लं. ना वाटत होती. पु. ल. कॉलरा-कॉलरा असे मनात म्हणत असतानाच त्यांचा नंबर आला. डॉक्टरांनी विचारले, कुठे जाणार? यावर पु. ल. म्हणाले, "कॉलऱ्याला" मग चूक लक्षात येताच इंग्लंडला असे त्यांनी सांगितले. पण पु. लं. जवळ पासपोर्ट नव्हता. एक तास रांगेत राहण्याचे कष्ट वाया गेले. पु. लं. ना दुसऱ्या दिवशी कॉलऱ्याचे इंजेक्शन घ्यावे लागले.

(५) पासपोर्ट - व्हिसा प्रकरण - परदेशी जायचे म्हटले तर पासपोर्ट-व्हिसा काढावे लागते. पु. ल. दोन वर्षापूर्वीच परदेशाला जाणार असल्यामुळे पु. लं. चे पासपोर्ट तयार होते, परंतु त्यावरील फोटोबद्दल पु. ल. साशंक होते. पोलिस स्टेशनावर 'वॉंटेड' लोकांचे फोटो जसे असतात तशा प्रकारचा पु. लं. चा फोटो होता. आणखी एक बाब म्हणजे पु. लं. ची सही नेहमी बदलत असते. दोन वर्षापूर्वी केलेल्या सहीसारखी सही वेळप्रसंगी पु. लं. ना काढता येईल की नाही याची त्यांना शंका होती. इंजेक्शनचे दाखले, पासपोर्ट वगैरे दस्तऐवज जमल्यावर इन्कम-टॅक्स ची कागदपत्रे गोळा करायची होती. 'इन्कम टॅक्स न बुडविता सदरहू इसम जात आहे' असे शिफारसपत्र पु. लं. ना पाहिजे होते. पु. लं. चा इन्कमटॅक्स कचेरीशी जुना ऋणानुबंध असल्याने त्यांचे काम लवकर झाले.

(६) जागतिक अशांततेचे वातावरण - पु. ल. इंग्लंडच्या प्रवासाची तयारी करीत असतानाच मध्यपूर्वेत बंडाळी झाली. अमेरिका, रशिया व इतर लहान-मोठ्या देशांनी आपापली विमाने मध्यपूर्वेत धाडली. युध्दाचे सावट निर्माण झाले. अशा या जागतिक अशांततेच्या वातावरणात पु. ल. नायलॉनचे पायमोजे घेऊ की नको या विचाराने अस्वस्थ होत होते. कुणी पु. लं. ची कुंडली पाहून तर कुणी हात पाहून परदेश दौऱ्यासंबंधी अनुकूल-प्रतिकुलता सांगत होते. युध्द होणार नाही हे सांगणारे ज्योतिषी पु. लं. ना जवळचे वाटत होते.

(७) विमानाची तिकिटे हातात आली - आंतरराष्ट्रीय वादळ शमल्यासारखे झाले नि पु. लं. च्या परदेश दौऱ्याचे तिकीट आले. पु. ल. विमानाची तिकीटे पहिल्यांदाच पाहत होते. पु. ल. बसेसच्या तिकिटा अतिशय जपून ठेवीत असत. विमानाचे तिकीट हे चेकबुकासारखे होते. त्यात बराच मजकूर लिहिलेला होता. तिकिटावरील नावे वाचता येण्यासारखी नव्हती. मिस्टर आणि मिसेस या दोन शब्दांवरून पु. लं. ना त्यांचे तिकीट कुठले ते कळले. सर्व तयारी झाली २० ऑगस्टला जाण्याचे ठरले. पु. लं. ची विमानात बसण्याची पहिलीच वेळ नसल्यामुळे त्यांना विमानाचे कौतुक नव्हते. एअर इंडियाच्या कचेरीतून पु. लं. ना नऊ वाजता विमानतळावर येऊन हजर होण्याची सूचना मिळाली.

(८) विमानाला उशीर आणि व्ही.आय.पी. ट्रिटमेंट - घरून निघण्यापूर्वी पु. लं. ना फोन करून विमान वेळेवर सुटणार की नाही याची चौकशी करा ही सूचना पु. लं. ना आठवली. पु. लं. ची याबाबतीत चेष्टा केली गेली. तेवढ्यातच विमान दोन तास उशीरा सुटणार याची सूचना फोनवरून मिळाली. गप्पा आणि शंकांना ऊत आला. विमान रात्री दीडला सुटणार होते. पु. ल. व त्यांच्या पत्नी साडेनऊलाच विमानतळावर हजर झाले. पु. लं. ची मित्रमंडळी व चाहतावर्ग विमानतळावर गर्दी करून होते. हारांच्या आणि फुलांच्या वर्षावामुळे विमानतळावरील अधिकाऱ्यांचा गैरसमज झाला. फोटोग्राफर फोटो घेत होते.

अधिकारीवर्ग पु. लं. ना व्ही.आय.पी. समजत होता. एकाने व्ही.आय.पी. खोली उघडली. एका गणवेषधारी अधिकाऱ्याने पु. लं. ना नम्रपणे व्ही.आय.पी. खोलीत चलण्याविषयी विनंती केली. व्ही.आय.पी. खोलीतील गर्दी-गबाळेपणा पाहून एका खाकीवाल्याची कॉमेन्टस् पु. लं. च्या कानावर पडली - "होगा कोई मिनिष्टरका बच्चा नही तो जमाई!" पु. लं. नी व्ही.आय.पी. समजून लहान मुलांना हार वाटणे, नमस्कार करणे इत्यादी लीला करून पाहिल्या. पन्नासएक रुपयाचे फोटो जबरीने घ्यावे लागले तेव्हा पु. लं. चा चेहरा फोटो काढण्यासारखा झाला.

(९) कस्टम अधिकाऱ्याच्या तावडीतून सुटका - कस्टम तपासणी सुरू झाल्याचे कळताच पु. लं. नी व्ही.आय.पी. कोठडी सोडली. काट्यावर सामान चढले. सामानाचे वजन चव्वेचाळीस पौंडाहून कमी भरले. पु. लं. नी सुटकेचा पहिला निःश्वास टाकला. पु. ल. कस्टमच्या अधिकाऱ्यांपुढे अपराध्याससारखा चेहरा करून उभे राहिले. कस्टमच्या अधिकाऱ्यांपुढे उभे राहण्याचा पु. लं. चा दुसरा प्रसंग होता. पहिल्या प्रसंगात तर पु. ल. हे मराठीचे प्राध्यापक असल्याचे कळताच कस्टम अधिकाऱ्याने पु. लं. ची ट्रंकदेखील पाहिली नव्हती. दुसऱ्या प्रसंगात मात्र कस्टम अधिकाऱ्याने पु. लं. च्या बॅगा पाहिल्यानंतर त्याने पु. लं. च्या चेहऱ्याकडे पाहिले व बॅगांवरून खडूची फुली मारली. नंतर पासपोर्ट तपासणाऱ्या अधिकाऱ्यांपुढे पु. लं. ना व त्यांच्या पत्नीना जावे लागले. पु. लं. ना पासपोर्टच्या वरील फोटोचे भय होते परंतु तिथूनही त्यांची योग्यरित्या सुटका झाली. त्यानंतर आरोग्याचे दाखले तपासणाऱ्या अधिक्काऱ्यांनी पु. लं. ना मुक्त केले.

(१०) आणि विमानाचे पंख फडफडले - परदेश दौऱ्यासाठी पु. लं. ना 'लायक' असा शेरा मिळाला. पु. ल. आता विमानाची वाट पाहू लागले. उतारुंसाठी असलेल्या कोचावर पु. ल. आणि त्यांची पत्नी बसली होती. विमानाकडे जाताना एक युरोपियन जोडपे होते. प्रवासात कुणी मराठी मंडळी आहेत की काय याचा शोध पु. लं. नी घेतला. जोशी, पाटील नावाची मंडळी भेटली. विमानाची खात्री झाली. प्रवेशद्वारावर 'यजमानीणबाई' उभ्या होत्याच. हवाई कर्मचारी चपळतेने इकडून तिकडे जात होते. विमानात बसल्यावर पोटावर पट्टा बांधताच विमानाने गती घेतली. नंतर विमानाने अवकाशात झेप घेतली. पु. लं. ना बराच वेळ विमानात झोप येत नव्हती. सराईत मंडळी झोपली होती. पु. लं. ना त्यांच्या अंगावरचा सूट चिलखतासारखा वाटत होता. आसपाच्या गोऱ्या प्रवाशांच्या अंगात फारसे कपडे नव्हते. पु. लं. इतका जावईपोशाख करणारा दुसरा कुणी नव्हता. पु. लं. चा नवखेपणा त्यांच्या नव्याकोऱ्या सुटामुळे त्यांना अधिकच जाणवत होता. काही वेळाने जपानी एअरहोस्टेस भिजलेले टॉवेल घेऊन पु. लं. जवळ आली. टॉवेलचे काय करायचे हे पु. लं. ना कळेना. त्यांनी टॉवेल घेतल्यानंतर इकडे तिकडे पाहिले. काही प्रवासी टॉवेलने तोंड पुसत होते. पु. लं. नीही मग टॉवेलची घडी तोंडावर ठेवली. पु. लं. ची पत्नी झोपली होती. कुणी डुलक्या घेत होते तर कुणी घोरत होते.

(११) बेहरीनचा चहा - सकाळी काळी पुन्हा जपानी एअरहोस्टेस प्रफुल्ल होऊन प्रवाशांना 'शय्या पेय' देत होती. पु. लं. नी चहाला नकार दिला व ते प्रसाधनगृहात गेले. मुखप्रक्षाळणादी विधी आटोपून पु. ल. आपल्या जागेवर पोचेपर्यंत 'पोटाला पट्टे आवळा'

Scanned by CamScanner

अशी सूचना मिळाली. एका वाळवंटवजा बेटाच्या दिशेने विमान उतरत होते. विमान बेहरीनला उतरले. सकाळचा चहा विमानतळावरच्या उपाहारगृहात मिळतो म्हणून प्रवाशी जाऊ लागले. विमानात इंधन भरले जात होते. विमानतळावर प्रवाशांना विमानकंपनी स्वखर्चाने चहा देते, असे पु. लं. ना कळले होते परंतु पु. लं. ना चहाचे पैसे द्यावे लागले. खजुरीची पाने वाळवून चहा करीत असावे असे पु. लं. ना चहाच्या चवीमुळे वाटले. चहात उंटीणीचे दूध असल्याची खात्रीच पटली. अर्धापाऊण तासाच्या विश्रांतीनंतर विमान कैरोच्या दिशेने निघाले. एका वाळवंटातून दुसऱ्या वाळवंटात विमान जात होते. दिवस वर आल्यानंतर पु. ल. विमानातून खाली पाहू लागले. कधी वाळवंट तर कधी समुद्र दिसत असे.

(१२) इजिप्तमध्ये स्वागत असो - कैरो विमानतळावर विमान उतरले. विमानतळावर युध्दासाठी सज्ज असलेल्या लष्करी विमानाचे दर्शन पु. लं. ना झाले. विमानतळावर 'इजिप्तमध्ये तुमचे स्वागत असो!' ही पाटी वाचून पु. लं. ना इजिप्तमधल्या विचित्र मनुष्यस्वभावाची मौज वाटली. उपहारगृहातल्या परिचारिकांनी पु. लं. चे स्वागत केले. त्यांना उत्तम इजिप्शियन कॉफी मिळाली. मुंबईच्या विमानतळापेक्षा कैरोचे विमानतळ लहान होते. कैरोच्या विमानतळावर 'इजिप्शियन' नावाच्या मनुष्यप्राण्याचे पु. लं. ना दर्शन झाले. पिरामिड, ममी आणि नाईल नदी याविषयी पु. लं. ना इतिहास वाचून माहीत होते. ह्या विमानतळावर काम करणाऱ्या मंडळीविषयी पु. लं. ना कुतुहल वाटले. दिवसातून पंचवीस वेळा नाना देशांतले नाना लोक तिथे अर्ध्या पाऊण तासापुरते एकत्र येतात आणि एखादे पेय घेऊन पुन्हा दाही दिशांना पांगतात.

(१३) जिनिव्हा आणि ड्युसलडॉर्फ - कैरोवरून विमान सुटल्यानंतर पुढचा टप्पा स्वित्झर्लंडमधल्या जिनिव्हाचा होता. जिनिव्हाच्या विमानतळावरचे विश्रांतीगृह हे आधुनिक फुलांच्या दुकानासारखे दिसत होते. सारे चेहरे ताजेतवाने होते. प्रत्येकाच्या चालीत नृत्य होते. पु. लं. चा केवळ पंधरा मिनिटाचा मुक्काम होतो. विमानाच्या कुशीत शिरताना स्वित्झर्लंडचा परिसर पु. लं. नी डोळे भरून पाहून घेतला. पुढचा टप्पा जर्मनीतला ड्युसलडॉर्फचा होता. मुंबई सोडल्यापासून वीसएक तास होऊन गेले होते. विमान किती उंचीवरून जात आहे, याची माहिती पु. लं. ना मिळाली पण पु. लं. ना अठराहजार उंच फुटांवरून विमान जात आहे की अठरा लाख फूट उंचीवरून हे कळत नव्हते. विमान ड्युसलडॉर्फला उतरले. पु. ल. लंडनच्या विमानतळाची वाट पाहू लागले. पु. लं. ना लंडनचा टप्पा त्रासदायक वाटला. जांभया देता देता लंडन आले.

(१४) लंडनचे दर्शन - संध्याकाळचे आठ-साडेआठ वाजले होते. लोक विमानतळावरून झपाझप चालत होते. लंडनमध्ये पावसाची भूरभूर चालू होती. थंडी वाढली होती. सर्वत्र शुकशुकाट होता. पाच-दहा मिनिटात कस्टम अधिकाऱ्यांपुढे बॅगा आल्या. कस्टम अधिकारी पु. लं. शी अतिशय नम्रपणे बोलत होता. त्याच्या नम्रतेने पु. ल. थोडे गांगरले. पु. लं. नी वस्तुंची यादी दाखवली. अधिकाऱ्याने बॅगवर खडूची फुली मारली. पु. लं. चे सामान एका बसमध्ये चढवण्यात आले. पु. लं. नी हमालाला जास्तच मजुरी दिली. कारण पु. लं. ना "साहेब, पोटावर नका मारु साहेब, पाठीवर मारा" असे शब्द ऐकायला मिळाले नाही. नऊ वाजले होते, बस लंडन शहराच्या दिशेने धावत होती. रस्ते संपूर्ण निर्मनुष्य होते.

(१५) रामभाऊ तडकोडांच्या घरी मुक्काम - शहरातल्या विमानउतारु अड्ड्यावर बस आली. पु. लं. चे मित्र रामभाऊ तडकोड उतरुन घ्यायला आले होते. रामभाऊच्या घरी पहिल्या दिवशी उतरल्यामुळे पु. लं. ना लंडनला आल्यासारखे वाटत नव्हते. लंडनमध्ये महाराष्ट्र मंडळ आहे. तेथे मराठी नाटक बसविण्याचे कार्य चालू आहे असे पु. लं. ना कळले.

(१६) सकाळी पु. ल. फिरायला निघाले - सकाळी फिरायला जाणे हा पु. लं. चा नित्यनेम होता. त्यांना रामभाऊच्या घरी पहाटेला जाग आली. थंडी होती. रामभाऊ किलबर्न विभागात राहत होते. पु. ल. नी फिरायला जाताना सोबत लंडनचे रस्ते दाखविणारा नकाशा घेतला होता. सुमारे वीस मिनिटे चालल्यानंतर त्यांना एक वर्तमानपत्र विकणारी मुलगी दिसली. खांबाला टेकवलेली सायकल व वर्तमानपत्राचा गठ्ठा खाली पडला होता. पु. लं. नी तिला मदत केली. पु. लं. चे परोपकार पाहायला मात्र कुणीच नव्हते. धन्यवाद देऊन ती मुलगी पसार झाली. पुढे चालत गेल्यानंतर एक उंच धिप्पाड व्यक्ती भेटली. ती व्यक्ती म्हणजे लंडनचा पोलिस. याला 'बॉबी' म्हणतात. तो आबाल-वृध्दांचा मित्र आहे. सदैव मदतीला हजर असतो. पु. लं. नी त्याला 'गुडमार्निंग' केले. तोही 'गुम्पॉंग' असे कुरबुरत पुढे निघून गेला.

(१७) लंडन शहरातली पहिली आंघोळ - बाग खणणे हा इंग्रजं पुरुषांचा लाडका शौक आहे. आणि कुत्र्याचे कौतुक करणे हा बायकांचा शौक आहे. पु. लं. ना फिरता फिरता हा अनुभव आला. तासभर फिरून पु. ल. सुखरुप परत आले. पु. लं. च्या पत्नीच्या अंदाजानुसार पु. ल. पंधरा मिनिटातच परत आले होते. लंडन शहरात सार्वजनिक स्नानगृहे आहेत. या थंड देशात आंघोळीची दैनिक आवश्यकता लोकांना वाटत नाही. इंग्लंडात स्नान हे प्रकरण पु. लं. ना अवघड वाटते. टबबाथ हा प्रकारच अवघड आहे. टबमध्ये गरम पाणी भरायला दरवेळी एक शिलिंग द्यावा लागतो. परदेश दौऱ्यात पु. लं. ना आंघोळीचे तंत्र जमले नाही.

(१८) स्वच्छ रस्ते पण नावात घोळ - इंग्लंडमधल्या सार्वजनिक बागा, रस्ते अतिशय स्वच्छ असतात. रस्त्यात केळ्याची साले नाहीत, पानशौकीनांच्या पिचकाऱ्या नाहीत. इमारतीच्या मधल्या चौकात खरकट्या पत्रावळी नाहीत. रस्ते, बागा, क्रीडांगणे अगदी लखख. इंग्रज लोक आपल्या रस्त्यांना नावे ठेवण्यात विलक्षण कद्रूपणा करतात. लंडन शहरात खाईस्ट चर्च ॲव्हेन्यूज निदान डझनभर तरी आहेत. आपल्याला हवा असलेला रस्ता एन् मध्ये आहे की एन्-डब्ल्यूत आहे, एसमध्ये आहे की एस-ईत आहे ह्या साऱ्या तपशिलाची खात्री करून घ्यावी लागते.

(१९) लंडनचा भुयारी रेल्वेचा प्रवास - भुयारी रेल्वेला इंग्लिश लोक ट्यूब म्हणतात. ह्या ट्यूबने सारे लंडन पोखरले आहे. इतका सुखाचा आणि बिनचूक प्रवास पृथ्वीतलावर अन्यत्र नसेल, असे पु. लं. म्हणतात. जागोजागी पाट्या लावून असल्यामुळे शंकांचे निरसन आपोआप होते. प्रत्येक स्टेशनाचे नाव जवळ जवळ दुसरे स्टेशन लागेपर्यंत बोर्डवर लिहिलेले असते. त्यामुळे कुणाला फलाणे स्टेशन आले का हो? असे विचारण्याची गरज नाही. रस्त्यात देखील रस्त्याच्या नावा-नंबरांचे बोर्ड स्वच्छ अक्षरात लावलेले असतात.

Scanned by CamScanner

पु. लं. ना पिकॅडलीला जायचे होते. पु. लं. ची इंग्रजी टिकीट देणाऱ्याला कळली नाह तेव्हा पु. लं. नी चिठ्ठीवर लिहून दिले. पु.लं. किलबर्नवरून भुयारी गाडीने पिकॅडलीत पोचले. पिकॅडली स्टेशनावर फिरते जिने होते. भुयारी रेल्वे, फिरते जिने, चिमुकल्या आगगाड्या अन् त्यात बसणारी गोरीगोरीपान मंडळींचा पु. लं. ना पुढे पुढे लोभच जडला

(२०) लंडन शहरातला गजबजलेला भाग - पु. ल. पिकॅडलीच्या भुयारातू बाहेर आले. संध्याकाळची वेळ होती. चारी बाजूंनी दिव्यांचा झगझगाट होता. रंगी विजेरी नळ्यांमधून रंगीबेरंगी प्रकाशात अनेक तऱ्हेच्या जाहिराती चमचमत होत्या. गोऱ्या तांबड्या, काळ्या, पिवळ्या अशा अनेक वर्षांच्या माणसांचे थवे जात होते. पु. लं. स थक्क होऊन पाहत होते. लंडन शहरातला हा गजबजलेला भाग आहे. लंडनमध्ये नाताळच्या वेळेस अन् कचेऱ्या सुरू होतात व बंद होतात तेव्हा गर्दी असते. सायंकाळ साडे-सहाच्या दरम्यान मात्र रस्त्यावर शांतता असते. दुकाने पाचला बंद होतात. खरेदीच वेळ सकाळी अकरा ते बारा आणि दुपारी दोन ते चार-साडेचार अशी असते.

(२१) लंडनचे सौंदर्य - इंग्रज लोक रहदारीचे नियम पाळत असतात. स्वच्छतेच्य बाबतीत तर ते कितीतरी पुढे असतात. वरच्या मजल्यावरून केरकचरा फेकणे, पि टाकणे हे इंग्लंडमध्ये दिसत नाही. लंडनमध्ये पावसाची सारखी बुरबूर असते. प्रचं धुके पडते. पु. लं. ना लंडन सुंदर वाटले. या शहरात पु. लं. ना विलक्षण टापटी जाणवली. प्रत्येकाच्या घरी छोटी बाग आहे. सार्वजनिक बगीच्यातल्या फुलांना मूलदेखी हात लावीत नाही. शहरभर जाहिराती लागलेल्या असतात पण त्या जाहिरातीना कु विद्रुप करीत नाहीत. लंडनचे आकाश सदैव ढगाळलेले असते. सूर्यदर्शनाची पंचाइ होते. हिरवळी अन् वृक्षे जागोजागी आहेत. पार्क भरपूर आहेत. हाइड पार्क माणसां फुलून जातो. आरामखूर्च्या भाड्याने घेऊन माणसे शांतपणे बसलेली असतात, तर का माणसे टाइम्स तोंडावर ठेवून झोपतात. लहान गुटगुटीत मुले हिरवळीवर बागडत असतात एखाद्या झाडाखाली तरुण-तरुणी प्रेमलीलामध्ये दंग झालेली दिसतात.

(२२) इंग्रजी स्त्रिया - लंडनमध्ये पुरुष आणि स्त्री यांतला नैसर्गिक भेद सोडू अन्य भेद नाही. 'इश्य' किंवा 'अय्या' म्हणणारी स्त्री इंग्लंडमध्ये सापडणार नाही. लंडनमध स्त्रीया सौंदर्याला फार जपत असतात. एका बाजुला स्त्री सामाजिक, आर्थिक जबाबदाऱ्या उचलते तर दुसऱ्या बाजुला ती सौंदर्यप्रसाधनाच्या साऱ्या शस्त्रास्त्रांची जुळवाजुळव करताना दिसते. कचेऱ्यांमध्ये स्त्रियांचेच राज्य. सेक्रेटरी पोरी कामाचे ढीग उपशीत असतात.

(२३) इंग्रजी जेवण - इंग्रजी जेवण अगदीच साधे असते. मोठमोठ्या दुकानांतू भोजनविभाग असतात. तिथे निम्मा स्वयंपाक तयार असतो. उकडणे, तळणे एवढेच का घरी करायचे असते. दुकानात 'फ्रोझन फूड' अतिशय स्वच्छ असतात. प्रत्येक वस्तू पारदर्शक कागदात गुंडाळून काचेच्या कपाटात ठेवली असतात. हॉटेलातही स्वच्छता असते श्रीमंत हॉटेल असो की गरीब हॉटेल असो पदार्थाच्या किंमतीत फरक नसतो. इंग्रजाल डुक्कर, बैल आणि बटाटा यापलीकडे इतर खाणे परवडत नाही. खाण्याचे शिष्टाचार दांड असतात. उकडलेले अर्धे अंडे खायचे झाल्यास काटेचमचे त्याला आवश्यक वाटते. इंग्र

कुटुंबात बसून जेवणे हा एक आनंददायक अनुभव असतो. गप्पा करीत, थट्टा करीत जेवायला इंग्रजांना आवडते.

(२४) प्रेक्षणीय स्थळांना भेटी - पु. लं. ना लंडनला पोचल्यानंतर तीनचार दिवसांनी एडिंबराचा नाट्यसंगीतोत्सव पाहायला जायचे होते म्हणून आधीच पु. लं. नी लंडनमधील प्रेक्षणीय स्थळे पाहून घेण्याचे ठरविले. मादाम नुसॉदच्या मेणाच्या मूर्तींचे प्रदर्शन पाहायला पु. लं. गेले. त्या इमारतीजवळ इंग्रजांनी रांग लावली होती. पु. ल. रांगेत नंबर लावून जिन्यावरून जात होते. मेणाचे प्रदर्शन सोडून ते 'कृत्रिम तारांगणात' आले. त्यानंतर मेणपुरीत आले. मादाम नुसॉदच्या मेणाच्या मूर्ती प्रदर्शनात हुबेहुब माणसांसारखी माणसे वाटतात. इंग्लंड, युरोपमधील काही प्रसिध्द स्त्री-पुरुषांचे पुतळे होते. पु. लं. ना गांधीजी, जीना, नेहरु यांचे पुतळे दिसले.

(२५) कॉंपेन गार्डन्समध्ये मुक्काम - लंडनला दोन तीन दिवस खरेदी, जागा पाहणे यात गेले. कॉंपेन गार्डन्स नावाच्या रस्त्यावर असलेल्या घरात पु. लं. ना एक खोली मिळाली. सुमारे दहा बाय बाराची ती खोली होती. घरमालकीणबाईनी पु. लं. ना अटींची यादी दाखवली. आठवड्याचे भाडे आगाऊ दिले पाहिजे अशी अट होती. दुसरी जागा मिळेपर्यंत इथेच तळ ठोकू असा पु. ल. नी विचार केला.

(२६) पुढचा मुक्काम पिटलॉक्रीमध्ये - लंडनमध्ये दोनतीन दिवस राहिल्यानंतर पु. ल. व त्यांच्या पत्नी स्कॉटलंडमधल्या पिटलॉक्रीला गेले. लंडनमधल्या यूस्टन स्टेशनवरून पिटलॉक्रीला जाणाऱ्या गाडीत पु. लं. चा प्रवास सुरू झाला. पु. लं. ज्या डब्ब्यात बसले त्या डब्ब्यात एकदोनच सहप्रवासी होते. ते मात्र कुणाशी काहीही बोलत नव्हते. पहिल्या दोन तीन तासानंतर एक प्रवासी बोलू लागला. पर्थला पु. लं. ना गाडी बदलवावी लागली. पर्थच्या फलाटावर पिटलॉक्रीच्या गाडीतून जाणारे पु. ल. आणि त्यांची पत्नी हे दोनच प्रवासी होते. संध्याकाळी आठच्या सुमारास पु. ल. पिटलॉक्रीला पोचले. स्टेशनाजवळच्या 'मॅक्केज'मध्ये पु. ल. थांबले. हॉटेलातल्या एका मध्यमवयाच्या बाईने 'धेशफँदे' असा पु. लं. चा उल्लेख केला. ब्रिटीश कौन्सिलने पु. लं. ची राहण्याची व्यवस्था, नाटकांची तिकीटे, प्रेक्षणीय स्थळांची यादी, ओळखपत्रे तयार ठेवली होती. हॉटेलमधली स्कॉटिश मंडळी बोलकी होती.

(२७) पिटलॉक्री : रमणीय स्थळ - पिटलॉक्री खंडाळ्यासारखे एक गाव आहे. स्कॉटलंडमधील प्रेक्षणीय स्थळांपैकी हे एक स्थळ आहे. पु. ल. हे पिटलॉक्रीला निसर्गसौंदर्य पाहायला आले नव्हते तर ते नाट्योत्सव पाहायला आले होते परंतु त्यांना पिटलॉक्रीच्या रमणीय स्थळाचे दर्शन झाले. रपेट करताना भोवताली डोंगर, गर्द झाडी, खोल दऱ्या, वळणावळणावर डोकावणारी टमेल नदी आणि तरुणतरुणींचे मेळावे नजरेत भरण्यासारखे होते. रपेट करताना पु. लं. ना स्कॉटिश लोक भेटले. त्यांच्याशी पु. लं. गप्पा करत असत. पु. लं. ना व सहमित्रांना डोंगरमाथा गाठायचा होता. पु. ल. मायभवानीचे नाव घेऊन डोंगर चढू लागले. दोन-तीन पोरीही गाऊ लागल्या. पु. लं. नी आपला गळा साफ केला. माथ्यावरून स्कॉटलंड डोळे भरून पाहिल्यानंतर डोंगर चढणीचे श्रम वाया गेले नाही, असे

Scanned by CamScanner

(२८) पिटलॉक्रीचा नाट्यमहोत्सव - पिटलॉक्रीला दरवर्षी एप्रिल ते ऑक्टोबर या काळात नाट्य, संगीत आणि चित्रकला महोत्सव चालत असतो. तेथे 'स्कॉटलंड्स थिएटर इन द हिल्स' हे थिएटर आहे. पु. लं. ना तेथे 'व्हाइट फाल्कन' नावाचे नाटक पाहायला मिळाले. लेखक आणि नट नामवंत नव्हते. मात्र अभिनय आणि निर्मितीमध्ये ते मागे नव्हते. नंतर याच रंगमंचावर पु. लं. ना शॉचे 'यू नेव्हर कॅन टेल' हे विनोदी नाटक पाहायला मिळाले. याही नाटकात 'व्हाइट फाल्कन' मधला नायक काम करीत होता. पिटलॉक्रीचे थिएटर कच्चे असले तरी रंगमंचावरची साधने अत्याधुनिक होते.

(२९) पिटलॉक्रीचा ऋणानुबंध - पु. लं. चा पिटलॉक्रीचा ऋणानुबंध अवघ्या चार-पाच दिवसाचा होता. तेथे नाट्यगृहाइतकेच टमेल नदीचा बांध आणि त्यातील सामन माशांची शिडी हे एक आकर्षण होते. चारपाच दिवसात पु. लं. ना पाश्चात्त्य जीवन अगदी जवळून न्याहाळता आले. दिवसभर भटकणे आणि रात्री गप्पा मारणे हा तिथला उद्योग होता. संध्याकाळी नाटक पाहणे यात चांगला वेळ जात असे. हॉटेलचा मालक मात्र पु. लं. ना अगदी ओझरता दिसायचा. शेवटल्या दिवशी रात्री कुणीतरी पियानो वाजवले. पु. लं. नी देखील 'वद जाऊ कुणाला शरण' वाजवले. हॉटेल मालकही संगीताचा वेडा होता. पु. लं. च्या चालीवर मालक इंग्रजी गाणे गुणगुणत होता. मालकाला पु. लं. चे गाणे रेकॉर्ड करायचे होते परंतु पु. लं. ना एडिंबराला जायचे होते. पु. ल. आपल्या पत्नीसहीत स्टेशनवर गेले. एडिंबराला सायंकाळशिवाय गाडी नव्हती. पु. लं. ची अवघडलेली स्थिती पाहून एका इंग्रज जोडप्यांनी त्यांना मदत केली.

(३०) हायलंडर्सच्या मुलुखात - इंग्रज जोडपे व्हाईट अन् त्यांची मुलगी यांच्यासोबत पु. ल. व त्यांच्या पत्नीचा प्रवास त्यांच्या गाडीतून झाला. दिवसभर त्यांच्यासोबत पु. ल. हायलंडच्या रम्य प्रदेशातून भटकले. डोंगराळ मुलखातून घाटाची वळणे घेत घेत लॉक टमेलच्या काठाकाठाने टुमदार खेडी होती ती पु. लं. ना पाहायला मिळाली. दिवस मावळताना एका डोंगरमाथ्यावर व्हाईटनी गाडी थांबवली. खाली खोल दरी होती. दरीतच एक खेडे वसले होते. मेंढरांचे कळप उतरणीला लागले होते. सुंदर संध्याकाळी बॅगपाईपचे स्वर कानावर पडले. बॅगपाईप हे स्कॉटिश सुशिरवाद्य ऐकायला मिळाले. स्कॉटलंडच्या डोंगरात मुलुखात यायला हवे, असे पु. ल. ना वाटते. पु. ल. लिहितात - "हायलंडर्सच्या मुलुखात संध्याकाळी हे वाद्य वाजले की प्रणयिनी व्याकूळ होत असाव्यात आणि मेंढरांची वाटचाल आपोआपच घराच्या दिशेने होत असावी. हे वाद्य केवळ समरभूमीवरच नव्हे तर स्मरभूमीवर देखील आर्त आव्हान देते!"

(३१) एडिंबराचे दर्शन - एडिंबरा हे स्कॉटलंडमधल्या साऱ्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय विचारांचे आगर आहे. एडिंबराला दरवर्षी एक सांस्कृतिक उत्सव होतो. पु. ल. एडिंबराला पोचले तेव्हा रात्र झाली होती. पु. ल. कॅम्पबेल बाईच्या घरी पोचले. तिने पु. ल. ना खोली दाखवली. आराम करा, असे म्हणून ती लुप्त झाली. खोली छोटीशी होती पण सुंदर होती. एका छोट्या टेबलावर तिकिटे, ब्रिटिश कौन्सिलची ओळखपत्रे, नाटकांचे वेळापत्रके, एडिंबरातील पाहण्यासारखी स्थळे, लंडनला जाणाऱ्या गाड्यांच्या वेळा इत्यादी न सांगता व्यवस्थित मांडून ठेवले होते.

एडिंबराच्या उत्सवाला सुरुवात झाली होती. चित्रकलाप्रदर्शने, शिल्पकलाप्रदर्शने, नृत्य-नाट्ये, विनोदी रंगीत बाऱ्या होत्या. कळसूत्री बाहुल्याचे खेळ होते. परदेशातून हजारो माणसे आली होती. पहिल्याच दिवशी पु. ल. बसमधून जाताना त्यांना म्हाताऱ्या आजीबाईची गर्दी दिसली. पु. ल. आपल्या पत्नीला म्हणाले, "ह्या एडिंबरात हे थेरड्यांचं पेव कुठे फुटलं?" आणि मागून आवाज आला - "आपण मऱ्हाटी आहात का?" पु. लं. एकदम थक्क झाले. ती बाई पंधरा वर्ष वाईला होती. त्यामुळे तिला मराठी समजत होते. तिने पु. लं. ना दुसऱ्या दिवशी संध्याकाळचे चहाचे निमंत्रण दिले. ब्रॉमेला बाईने मराठी पाहुण्यासाठी मिरच्यांची भजी केली. तिने हिरव्या बांगड्या घातल्या होत्या. निरोप देताना पु. लं. च्या पत्नीच्या कानशिलावर आपली बोटे मोडीत ब्रॉमलेबाई म्हणाल्या, "बा ऽऽ य, ये ग पुण्हा!"

(३२) एडिंबरातील ऐतिहासिक स्थळे - पु. लं. चा एडिंबरातील ऐतिहासिक स्थळे पाहण्याचा कार्यक्रम सुरू झाला. गाईड सोबत असला की, एखादे स्थळ नीट पाहता येत नाही. एडिंबराला होलीरुड हाऊस राजप्रासाद पाहताना पु. ल. थक्क झाले. राजेलोकांच्या शौर्याच्या नि क्रौर्याच्या कहाण्या ऐकताना विचारांची गर्दी पु. लं. ना अस्वस्थ करीत असे. त्या राजवाड्यातै पु. ल. ना मेरी स्टुअर्टसचा एक आरसा पाहायला मिळाला. राजप्रासादातून पु. ल. सेंट जाइल्स कॅथीड्रलमध्ये आले. त्या भव्य वास्तूपुढे पु. लं. नतमस्तक झाले. या प्रार्थना मंदिरात यात्रिकांचा मेळावा भक्तिभावाने गुडघे वाकवीत होता. गाईड माहिती पुरवीत होता.

(३३) एडिंबराच्या उत्सवातील चित्रकला प्रदर्शन - एडिंबराच्या उत्सवात पु. लं. ना चित्रकलाप्रदर्शन पाहायला मिळाले. तिथे जुन्या चित्रकारांपासून तर आधुनिक पिकासोपर्यंतच्या चित्रकारांची चित्रे होती. पु. लं. ना रंगापेक्षा स्वराचा ओढा अधिक आहे. चित्रकला प्रदर्शनात हिंडताना पु. ल. अगदी गरीब गाय होऊन जातात. पु. लं. ना चित्र ओळखता आले नाही की, ते अस्वस्थ होतात. फुलांसारखी फुले, मुलांसारखी मुले आणि बायकांसारख्या बायका दिसणारी चित्रे पाहत पाहत पु. ल. पिकासोपर्यंत येऊन थडकले. पिकासोच्या चित्रांचा अर्थ पु. लं. ना कळत नव्हता. एक गृहस्थ पिकासोच्या चित्राकडे ध्यानमग्न होऊन पाहत होते. पु. ल. त्या गृहस्थाकडे पाहत होते. त्या गृहस्थालाही चित्राचा अर्थ कळत नव्हता. मात्र तो गृहस्थ तीस वर्षापासून चित्रे पाहत होता.

(३४) ऑक्सफर्डच्या विद्यार्थ्यांचे प्रहसन - एडिंबराच्या उत्सवाच्या निमित्ताने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांचे एक प्रहसन होते. त्यात गाणी, नाच, गंमतीचे चुटके होते. कार्यक्रम अत्यंत सूत्रबध्द होता. कलाकार आठदहाच होते. चंद्रलोकावर इंग्रज, अमेरिकन, रशियन, चिनी आणि फ्रेंच वसाहतकारांची झालेली पहिली भेट मोठी मजेदार होती. अर्थात शेवटी शहाणा ठरला तो इंग्रजच. प्रहसन अतिशय साधे होते पण प्रकाशाच्या जादुने लाकडी चबुतऱ्यावर चंद्रलोकाची किमया केली होती.

रात्रीला एका स्कॅटिश जोडप्यांनी पु. लं. ना त्यांच्या निवास्थानापर्यंत गाडीतून सोडले.

(३५) एडिंबरातील नाटके - पु. लं. ना सर्वात जास्त आनंद एडिंबरातील नाटके पाहून झाला. एडिंबरात, शेक्सपीयरच्या काळात ज्या पध्दतीने नाटक करीत त्या पध्दतीने

Scanned by CamScanner

शिलरच्या 'मेरी स्टुअर्ट' चे नाटक पु. लं. ना पाहायला मिळाले. एडिंबराच्या असेंब्ली हॉलचे नाट्यगृहात रुपांतर केले होते. एलिझाबेथ आणि मेरी या दोघीनीही या नाटकात अभिनयाचा उच्चांक गाठला होता. एडिंबरात पु. लं. नी 'बोनफायर' नावाचे नाटक पाहिले. दोन धार्मिक नटांत 'होळी'वरून झालेले भांडण हा त्या नाटकाचा विषय होता. पु. लं. चे दिवसा ऐतिहासिक स्थळे, निसर्गसौंदर्य पाहणे सुरू होते व सायंकाळी नाटके पाहणे सुरू होते. एके ठिकाणी पु. लं. ना कळसूत्री बाहुल्याचा खेळ पाहायला मिळाला. रूदरफोर्ड नावाची व्यक्ती बाहुल्याचा खेळ करीत होती. त्याच्या खेळाला गर्दी नसे पण तो प्रामाणिकपणे आपली कला सादर करीत होता.

(३६) पु. लं. चा टेलिव्हिजनचा शिक्षणक्रम - एडिंबराहून परत आल्यानंतर लंडनमध्ये पु. लं. चा मुक्काम दोन तीन महिने होता. बी.बी.सी. च्या शाळेत पु. लं. चा टेलिव्हिजनचा शिक्षणक्रम होता. स्टाफ ट्रेनिंग स्कूलमध्ये पु. लं. सहीत अठरावीस विद्यार्थी होते. सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी पाचपर्यंत शाळा चालत असे. त्यानंतर स्टुडिओमध्ये जावे लागे. तेथील शिस्त, नियमितपणा, टापटीप पाहून पु. लं. थक्क झाले. सुमारे अडीच महिन्यात पु. लं. चे प्रशिक्षण आटोपले. बी.सी.सी. चा प्रचंड व्याप होता. प्रोड्यूसरला सेक्रेटरी असे. सेक्रेटरी पोरी हसऱ्या चेहऱ्याने कामाचे भारे उचलीत. नियमितपणामुळे बी.बी.सी. ला यश मिळाले. टेलिव्हिजनच्या शाळेतले पु. लं. चे दिवस अत्यंत आनंदात गेले. बी.बी.सी. तले मोठ्यातले मोठे अधिकारी पु. लं. ना शिकवायला आले होते.

(३७) कार्लाइलचे घर - टेलिव्हिजनच्या शाळेतून सवड मिळाली की पु. लं. लंडन शहर पाहायला जात. एकदा कार्लाइलचे घर पाहायला पु. ल. गेले. कार्लाइल १८८१ मध्ये वारला. त्याचे घर इंग्लंडच्या पुराणवस्तुविभागाच्या मालकीचे आहे. एका म्हाताऱ्या बाईने कार्लाइलचे घर पु. लं. ना दाखविले. ती बाई तीस वर्षापासून त्या घरात राहत होती. तिच्या सासूने ३३ वर्षे हे घर सांभाळले होते. कार्लाइलला बागेचा शौक होता. तो स्वत: बागेत खुरपे चालवी, फुलझाडे लावीत असे. उन्हाळ्याच्या दिवसात तो तेथे वाचन करीत असे. कार्लाइलच्या अभ्यासिकेत पु. ल. गेले. तेथील काही पुस्तके पु. लं. नी चाळली. कार्लाइल ज्या खुर्चीवर बसत असे त्या खुर्चीवर पु. लं. नी बसून पाहिले. रॉबर्ट ब्राऊनिंग आला की त्याच खुर्चीवर बसत असे, अशी माहिती त्या म्हातारीने पु. लं. ना दिली.

पु. ल. नी डिकन्स, कीट्स, जॉन्सन यांचीही घरे पाहिली पण पु. लं. च्या अंत:करणात घर केले ते मात्र कार्लाइलच्या घराने!

(३८) लंडनचे प्राणीसंग्रहालय - पु. ल. लंडनचे प्राणीसंग्रहालय पाहायला गेले तेव्हा प्राण्यांची भोजनाची वेळ होती. प्राणी मांसखंड तोडण्यात तन्मय झाले होते. मुला-माणसांची गर्दी होती. या प्राणीसंग्रहालयात पु. लं. ना गरुडपक्षी पाहायला मिळाला. प्राणी संग्रहालयात सर्वात लोकप्रिय प्राणी हत्ती होता. मुले हत्तीला मटण, हॅम, एग, सँडविचेस खायला देत होती. प्राणीसंग्रहालयात पु. ल. दिवसभर भटकत होते. एका पिंजऱ्यात त्यांना शहामृग दिसला. त्या शहामृगाने पु. ल. कडे डोळे काढून पाहिले. माकड, गायी तेथे होत्या. भारतीय गाय पु. लं. ना भलती करुण वाटली - बंदिस्त देवकीसारखी!

(३९) टॉवर ऑफ लंडन - लंडनचा टॉवर तमस नदीच्या काठी आहे. टॉवरच्या आतल्या भागात इंग्रजांच्या पुराणमताभिमानाची साक्ष पटते. शस्त्रागार आणि जवाहिरखाना ही इथली प्रमुख आकर्षणे! दारात गार्ड उभा असतो. त्याचा आठव्या हेन्रीच्या अमदानीतला पोशाख असल्याचे जाणवते. टॉवर ऑफ लंडनमधल्या गार्डने पु. लं. जवळ मुंबईची चौकशी केली. हिंदुस्थानविषयी त्याला जिव्हाळा वाटत होता. त्या म्हाताऱ्या गार्डचा निरोप घेऊन चोरवाटेने पु. ल. तमसेचे दर्शन घेण्यासाठी निघाले. लंडनचा दुभंगणारा पुल पु. लं. नी पाहिला. टॉवर ऑफ लंडनमधले सर्वात मोठे आकर्षण म्हणजे कोहिनूर हिरा. तेथील जवाहिरखान्यात खूप हिरे आणि रत्नजडित अलंकार होते. पु. लं. ना तर बहुतेक हिरे कोहिनूर वाटले. इंग्लिश राजाराणींचे मुकुट, राजदंड, राजचिन्हे पु. लं. ना पाहायला मिळाले.

(४०) माणसांबद्दलची ओढ - पु. लं. ना माणसांना पाहायला जास्त आवडते. परदेशच्या प्रवासात पु. लं. ना सगळ्यात अधिक ओढ होती ती तिकडची माणसे पाहण्याची, त्यांच्याशी बोलायची. बोलणे जमले नाही तरी पु. लं. ना माणसे पाहता आली. पु. ल. एकदा पार्लमेंट पाहायला गेले. तेथे त्यांना चर्चिलला पाहता आले. परदेशात पु. लं. ची माणसांची भूक भागली नाही. पु. लं. ना बोलकी माणसे फार कमी मिळाली. बर्मिंगहॅमला पु. लं. ना एक लॅंडलेडी भेटली. तिची मुलगी आणि ती फार बोलकी होती. एकदा या मंडळीशी पु. लं. च्या गप्पा रात्री दोन वाजेपर्यंत रंगल्या होत्या.

(४१) इंग्लंडमधील पब्स - इंग्रज माणूस अबोले आहे. त्याच्या घरी भयाण शांतता असते. मात्र 'पब्स' मध्ये तो बोलका होतो. 'पब्स'ना दारुचा गुत्ता म्हणणे हा पब्सचा अपमान आहे असे पु. लं. म्हणतात. पब्समध्ये इंग्रज केवळ दारु प्यायला येत नाही, तो बडबडायला येतो. साधी बियर घेतली तरी इंग्रज माणसाला कंठ फुटतो. मात्र त्याला घड्याळाचे विस्मरण होत नाही. तेथे रात्री अकराला पब बंद होतो. पंधरा मिनिट आधी घंटा वाजते. दर्दी मंडळींची काऊंटरकडे गर्दी होते. वेल्श मंडळींचा गट गाणे सुरू करतो.

(४२) पु. लं. ची ऑक्सफर्ड भेट - पु. ल. बर्मिंगहॅमचा मुक्काम आटोपून ऑक्सफर्डला गेले. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज ही दोन विद्यापीठे म्हणजे इंग्रजांचे दोन ज्ञानचक्षू आहेत. ह्या दोन डोळ्यांनी इंग्रज जगाकडे पाहतो. असंख्य इंग्रज शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, राजकारणी, समाजसुधारक ह्या दोन विद्यापीठांतून तयार झाले. युध्दपरिस्थितीतही हे विद्यापीठ वाचले. ज्ञानसाधनेत खंड पडला नाही. दोन्ही विद्यापीठात चुरस आहे. डॉ. सुरेंद्र बारलिंगे हे ऑक्सफर्डला होते. त्यांनी पु. लं. ना ख्यातनाम ब्रिटिश तत्त्वज्ञ प्रो. राईल यांच्या घरी नेले. राईलने पाच मिनिटातच पु. लं. ना मोहून टाकले. ऑक्सफर्ड दिसायला सुंदर नाही. तिथल्या इमारतीनी शतके गाठली आहेत. इथली कॉलेजे म्हणजे जुनी चर्चेस!

(४३) चर्चमधील ऑर्गन - पु. लं. ना चर्चमधल्या ऑर्गनचे विलक्षण आकर्षण आहे. ऑर्गनमधल्या स्वरांची गहिराई अथांग असते. ऑर्गन वाजविण्याची इच्छा पु. लं. नी स्मिथसाहेबांजवळ व्यक्त केली. त्यांनी डॉ. वॉटसनकडे बोट दाखविले. डॉ. वॉटसन हे ऑक्सफर्डमधील गीत विभागाचे प्रमुख होते. डॉ. वॉटसननी सुरुवातीला ऑर्गन वाजविला.

Scanned by CamScanner

नंतर पु. लं. नी वाजवायला सुरुवात केली. पु. लं. नी पंधराएक मिनिटे पूरिया-धनाश्री वाजवला. पु. लं. ना चार स्तरांवरच्या पट्ट्यांचा उपयोग जमवत नव्हता. मात्र स्वरांच्या विविध जाती निर्माण होत होत्या. पु. लं. ना एकदम अलिबाबाच्या गुहेत शिरल्यासारखे वाटले. पु. ल. ऑक्सफर्डमधल्या मुक्कामात ऑर्गनचे स्वर डोक्यात घेऊनच वावरले.

(४४) इंग्रजांचा स्वभाव - इंग्लंडमधल्या दोन-तीन महिन्याच्या वास्तव्यानंतरही पु. लं. ना इंग्रजांच्या स्वभावाचा पत्ता लागला नाही. एकीकडे आधुनिक तर दुसरीकडे जुन्यातला जुना असा चमत्कारिक सांधा इंग्रज माणसांचा आहे. चर्च, पब, पब्लिक, स्कूल, थिएटर आणि क्रिकेट यावर हा समाज उभा आहे. उत्तम व्यापारी म्हणून इंग्रज माणसांची ख्याती आहे परंतु सायंकाळी बरोबर पाच वाजता तो दुकान बंद करतो. पार्टीच्या वेळेस पुरुषांनी टाय लावलेच पाहिजे. मडपा मात्र कमी कपड्यात असतात. 'बेड टी', 'बूफे' हा प्रकार इंग्रजांचा! (हे दोन्ही प्रकार भारतात रुढ झाले आहेत!) इंग्रज माणूस एरव्ही बोलत नाही. पब किंवा कॉकटेल पार्ट्यांमध्ये मात्र ते तासनतास उभे राहून बोलतात. केंब्रिजमधल्या चर्चमध्ये हजार-दीड हजार विद्यार्थी-विद्यार्थींनी खिस्ताला सुरेल आवाजात आळवीत होते. ही शिस्त पाहून पु. ल. थक्क झाले. बुद्धिनिष्ठ असलेल्या इंग्रजाने राजा आणि खिस्त या दोन्ही संस्था टिकवल्या आहेत. इंग्रजांचा नियमितपणा, टापटीपपणा पु. लं. ना आवडतो. इंग्रजांची राणीवरची श्रध्दा पाहून पु. ल. थक्क झाले.

(४५) ऑक्सफर्डची वादविवाद सभा - ऑक्सफर्डची वादविवाद सभा फार प्रसिध्द आहे. ही वादविवाद सभा म्हणजे, इंग्लंडचे पार्लमेंटेरिअन्स तयार करण्याची पाठशाळा होय. अनेक विषयावर येथे वादविवाद होतात. आंतरराष्ट्रीय राजकारणापासून किंवा गहन तत्त्वज्ञानापासून ते 'तरुणीचे सौंदर्य त्यांच्या डोळ्यांत आहेत की डोक्यांत?' इथपर्यंत सर्व विषयांवर वादविवाद होतात. हे वादविवाद तत्त्वबोधासाठी नसतात, हे केवळ शब्दांचे शरसंग्राम असतात. लोकशाहीचे बाळकडू इथे पाजले जाते. ह्या वादविवाद सभांतून मुख्यत: भाषेची उपासना चालते. विषयांना खास महत्त्व नाही.

(४६) लंडन युनिव्हर्सिटी - ऑक्सफर्ड आणि केंब्रिज युनिव्हर्सिटीची शान लंडन युनिव्हर्सिटीला नाही. मात्र लंडनचे 'स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज' पाहण्यासारखे आहे. पुण्याचे व्यंकटेशशास्त्री जोशी तिथे संस्कृत शिकविण्यासाठी होते. पु. लं. चा त्यांच्याशी परिचय झाला. तिथल्या मराठी विभागाच्या प्रमुख मिस् लँबर्ट ह्या होत्या. त्यांनी पंधरावीस वर्षे पुण्यात घालविली होती. मिस् लँबर्टनी पु. लं. ना व त्यांच्या पत्नीला चहाचे निमंत्रण दिले. पु. लं. नी ते स्वीकारले. दुसऱ्या दिवशी चार वाजता पु. ल. त्यांच्या संस्थेत गेले. तिथल्या लायब्ररीत पु. लं. ची काही पुस्तके होती. लँबर्टबाई पु. लं. शी आवर्जून मराठी बोलत होत्या. तिथे अजून मराठी समजणारे इंग्रज पु. लं. ना भेटले. लायब्ररीत काही पुस्तके चाळता-चाळता जयदेवाच्या 'गीतगोविंदा'चे इंग्रजी भाषांतर पु. लं. ना सापडले.

(४७) इंग्रजी रंगभूमी - इंग्रजांना नाटकाचे वेड आहे. पु. लं. ना तर आहेच आहे. इंग्लंडमधल्या मुक्कामात पु. लं. नी वेड्यासारखी नाटके पाहिली. पु. लं. ना कलावंताच्या आवाजांच्या फेकीची करामत वाटली. चार्ल्स लॉटनचे 'पार्टी' नाटक पु. लं. ना आवडले.

लॉटनने सिनेमातही काम केले आहे. 'पार्टी' मध्ये त्याने एका दारुड्या बापाची भूमिका केली, ती लक्षणीय होती. सर राल्फ रिचर्डसनचे 'फ्लॉवरिंग चेरी', ओल्डविक कंपनीचे 'ज्यूलियस सिझर' व 'एंटरनेटर' सारखे आधुनिक नाटक पु. लं. नी पाहिले. इंग्लंडमध्ये हौशी रंगभूमी आहे. 'ब्रिटिश ड्रामा लीग' च्या पंखाखाली जवळ जवळ आठशे हौशी संस्था आहेत. तिथे नवीन प्रयोग होतात, नाट्यशिक्षण शिबीरे होतात. या सर्व संस्थांतील नटनटींना व्यावसायिक रंगभूमीवर जाण्याची महत्वाकांक्षा असते. लहान मुलांची रंगभूमी देखील व्यावसायिक स्वरुपाची आहे.

(४८) शेक्सपिअरच्या गावाला - जुन्यातल्या जुन्या आणि नव्यातल्या नव्या प्रेक्षकाला स्थळकाळाचा विसर पडायला लावणारा एकमेव महान नाटककार म्हणजे शेक्सपिअर! पु. ल. ऑक्सफर्डवरून 'स्ट्रॅटफर्ड ऑन एव्हन' या शेक्सपीअरच्या गावाला निघाले. शेक्सपीअरच्या गावी जाऊन त्याच्या समाधीला प्रणाम करण्याची पु. लं. ची इच्छा होती. पु. ल. शेक्सपीअरच्या गावाला जाताना आनंदीत होते. दुमजली बसमधून बाहेरची शोभा पु. लं. ना प्रसन्न करीत होती. एव्हन नदीजवळ बस आली. या नदीच्या काठी विल्यम शेक्सपीअर लहानाचा मोठा झाला होता. पु. ल. गावात पोचले तेव्हा दिवे लागणीची वेळ झाली होती. पु. लं. चा तीनचार दिवसाचा मुक्काम होता. शेक्सपीअरच्या गावाचे डोळे भरून दर्शन घेण्याची पु. लं. ची लालसा होती. स्ट्रॅटफर्ड हे गाव म्हणजे नाट्यप्रेमी लोकांची मक्का, रोम, काशी... होती. शेक्सपीअर मेमोरिअल थिएटरात नाट्योत्सव चालू होता. दरवर्षी हा उत्सव उन्हाळ्यात सुरू होतो. स्ट्रॅटफर्ड हे गाव एखाद्या फुलासारखे ताजे टवटवीत होते. पु. लं. सोबत डॉ. बारलिंगे होते. छोट्याशा मुक्कामात 'हॅम्लेट', 'रोमिओ अँण्ड ज्यूलिएट', 'ट्वेल्फ्थ नाईट' ही तीन नाटके पु. ल. पाहणार होते. तिकिटांची व्यवस्था ब्रिटिश कौन्सिलने केली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी पु. ल. प्रदक्षिणेला निघाले. पहिले दर्शन अर्थात शेक्सपीअरच्या समाधीचे. वेल्श नावाची बाई. तीने तीस वर्षे स्ट्रॅटफर्डला घालविली होती. त्यांच्याकडे पु. लं. चा मुक्काम होता. त्या बाईने पु. लं. ना नाटकाविषयी पुष्कळ माहिती सांगितली. 'हॅम्लेट' हे नाटक तिने अनेकवेळा पाहिले. खाणावळ चालविणाऱ्या या बाईला 'हॅम्लेट' कळला होता. स्ट्रॅटफर्डच्या चर्चच्या परिसरात शेक्सपीअरचे थडगे आहे. त्याचे स्मारक एव्हन नदीच्या काठी आहे. शेक्सपीअरच्या समाधीला पु. लं. नी मनोमन प्रणाम केले. चर्चच्या मागून एव्हन नदी संथपणे वाहत होती. पु. ल. काही वेळ नदीतीरी बसले होते.

थिएटरला जोडून एक प्रदर्शन होते. शेक्सपीअरच्या नाटकातून कामे केलेल्या नटांचे आणि नटींचे पोर्टेट पु. ल. ना पाहायला मिळाले. शेक्सपीअरनी घेतलेले घर तेथे नाही. मात्र त्याने लावलेली बाग आहे. शेक्सपीअरचे खरे स्मारक म्हणजे एव्हन नदीकाठचे मेमोरियल थिएटर. पु. लं. नी तेथे 'हॅम्लेट' नाटक पाहिले. हॅम्लेटच्या मानाने 'रोमिओ अँण्ड ज्यूलिएट' चा प्रयोग थिटा वाटला.

(४९) लंडनचा मुक्काम आवरत आला - स्ट्रॅटफर्डवरून आल्यानंतर पु. लं. नी काही नाटकाचे प्रयोग लंडनला पाहिले. 'डिलन टॉमस' पु. लं. ना प्रभावीत करून गेला. टी. एस. इलियटचे 'एल्डर स्टेट्समन' पु. ल. ला आवडले नाही. 'फाइव्ह फिंगर एक्सरसाईज'

Scanned by CamScanner

हे नाटक आवडले. या नाटकाची रंगसज्जा पु. ल. ना आवडली नाही. पु. लं. चा टेलिव्हिजनचा अभ्यासक्रम संपला होता. लंडनचे वास्तव्य आटोपत आले होते. पॅरिसमध्ये पुन्हा दोन महिन्याचा अभ्यासक्रम व्हायचा होता. लंडनच्या फेस्टिव्हल हॉलमध्ये पु. ल. ना यहुदी मेनुहिनचे व्हायोलिन ऐकायला मिळाले. इंग्लंडमधला मुक्काम आटोपताना पु. लं. ना दु:ख होत होते. थोर कलावंतांच्या कलादर्शनाला मुकावे लागेल याचे जास्त दु:ख पु. लं. ना होत होते. लंडनला नाताळ, खेळणी विकणारे दुकानदार, मुले, मुलांचे आईवडील खिसमसमध्ये जल्लोसित होतात. नाताळ पाश्चात्य कुटुंबात साजरा करावा असे पु. लं. ना वाटले होते परंतु लंडनहून त्यांना पॅरिसला जायचे होते.

(५०) पॅरिस ते क्रेफेल्ड - पु. ल. लंडनहून पॅरिसला विमानाने गेले. विमानाचे अंतर केवळ दीड तासाचे होते. पॅरिसला पु. लं. चे मित्र माधव आचवल होते. ब्रोशा नावाच्या पॅरिसच्या भागात एका खाजगी हॉटेलात माधव आचवल राहत होते. त्यांच्याच शेजारी पु. लं. ना खोली मिळाली. तेथे रात्री मुक्काम करून पु. ल. दुसऱ्या दिवशी आगगाडीने जर्मनीतल्या क्रेफेल्ड शहरी जायला निघाले. पु. ल. पहाटेला निघाले. रेल्वेचा प्रवास होता. क्रेफेल्ड शहरी पु. ल. पोचले तेव्हा सायंकाळ झाली होती. पु. लं. चा मुक्काम एका खाजगी हॉटेलात होता. तेथे माधव आचवलांचे भाऊ पंडित आचवल होते. ते जर्मन भाषेत बोलत होते. पु. लं. ना तेथे पाच-सहा कुटुंबातून भोजनाची आमंत्रणे आली होती.

(५१) जर्मन अगत्य - पंडित आचवलच्या कॉलेजातले प्रोफेसर्स आणि इतर सहाध्यायी यांनी पु. लं. चा जो पाहुणचार केला त्याची तुलना पु. ल. वऱ्हाडी अगत्याशी करतात. जर्मन माणूस कमालीचा कौटुंबिक आहे. कुटुंबातले वातावरण पाहून पु. लं. ना भारतात आल्यासारखे वाटले. इंग्रजांच्या बेतशुद्ध पाहुणचारापुढे तुलनेने जर्मन अगत्य पु. ल. ना भलतेच आकर्षक वाटले. पु. ल. एकदा ष्मिड कुटुंबात जेवायला गेले होते. फ्रांझ आणि इल्मा हे जोडपे दृष्ट लागण्यासारखे वाटले. फ्रांझ खट्याळ आणि इल्मा शांत पण विलक्षण लाघवी होती. जर्मन लोक विलक्षण कलासक्त आहेत. संगीत त्यांच्या रोमरोमात भिनलेले आहे.

(५२) क्रेफेल्ड आणि डुसलडॉर्फ - क्रेफेल्ड शहर टुमदार आहे. तिथून पाचसहा मैलावर डुसलडॉर्फ हे शहर आहे. ऱ्हाईन नदी या शहरामधून वाहते. डुसलडॉर्फ हे शहर प्रचंड आहे. युद्धकाळात क्रेफेल्डवर ७२ तास बॉंबिंग झाले होते. सर्व काही राख झालेले हे शहर पुन्हा उभे राहिले. नव्या वर्षाचे स्वागत जर्मनीत झाले. क्रेफेल्डमधल्या एका हॉटेलमध्ये जर्मन मित्रमंडळीसोबत पु. ल. 'हॅपी न्यू इयर' मध्ये सहभागी झाले. रात्री बारा वाजता दारुकाम उडत होते. तरुण-तरुणी, म्हातारे कोतारे आनंदाने नाचत होते. पहाटेपर्यंत आनंदोत्सव चालू होता. पु. ल. एका जर्मन गृहस्थाच्या घरी पहाटे पाच वाजता कॉफी प्याले. सकाळी आठ वाजता पु. लं. ना पॅरिसला जायचे होते. पु. ल. स्टेशनच्या दिशेने निघाले तेव्हा रात्र जागवून सारे क्रेफेल्ड झोपले होते. पु. लं. नी जड अंत:करणाने क्रेफेल्डचा निरोप घेतला. पु. लं. ना क्रेफेल्डमध्ये अतिशय प्रेम आणि जिव्हाळा लाभला.

(५३) फ्रेंच भाषा - पु. ल. पॅरिसला आले. पॅरिसमध्ये त्यांचा मुक्काम होतेल-द-ला-गारमध्ये होता. इथली लँडलेडी व तिचा नवरा प्रेमळ होते. पु. ल. फ्रेंच भाषेची तुलना शँपेनशी करतात. फ्रेंच भाषा बाटलीतून ग्लासात ओतल्या जाणाऱ्या शँपेनसारखी खळखळते – फसफसते – जिभेच्या शेंड्याशी सारखा लडिवाळपणा करीत असते. ही भाषा केवळ जिभेने बोलायची भाषा नाही. ती डोळ्यांनी, भिवयांनी, मानेने आणि हातापायांनी बोलायची भाषा आहे. फ्रेंच भाषा शिकणे पु. लं. ना अवघड वाटले. हातवारे करून फ्रेंच माणसे बोलत असतात. पु. लं. चा दोन महिने पॅरिसचा मुक्काम होता. परंतु त्यांना फ्रेंच भाषा आत्मसात करता आली नाही. एकदा पु. लं. ना दूध घ्यायचे होते. दुधाला फ्रेंचमध्ये काय म्हणतात ते पु. लं. विसरले. शेवटी त्यांना चित्र काढून दाखवावे लागले. तेव्हा दुकानातील पोरगी 'ओले-ओले' असेच काहीतरी ओरडत गेली आणि तिने दुधाची बाटली आणून दिली. पहिले आठ दिवस पु. लं. चे अतिशय खडतर गेले.

(५४) पॅरिसची स्वरुपे - फ्रेंच माणूस दिलेल्या वेळी हजर राहत नाही. उशीरा येणे, अपॉइंटमेंट चुकवणे हे फ्रेंच माणसाचे लक्षण आहे. फ्रेंच माणसाने स्वत:ला कसल्याच पिंजऱ्यात अडकवून घेतले नाही. पॅरिसमध्ये लोकशाहीचे पहिले उष:सूक्त गायिले गेले. झोलासारख्या साहित्यिकाने आपली लेखणी अन्यायाविरुद्ध तलवारीसारखी उगारली. सोरबॉं विद्यापीठ, प्रूस्तसारखा लेखक, हसविणारा मोलिअर आणि सीन नदी अशी पॅरिसची अनेक स्वरुपे आहेत. टुरिस्टांचे पॅरिस, फ्रेंचांचे पॅरिस निराळे आहे. पॅरिस म्हणजे फ्रान्स नव्हे. तलम, पातळ, झिरझिरीत, नखरेल पॅरिस म्हणजे पॅरिस नव्हे! प्रोफेसर ग्रासेच्या बुटावर पाणी पडलेले आपल्या नव्या हातरुमालाने चटकन वाकून पुसून काढणारा विद्यार्थी पॅरिसमध्ये आढळतो. बियरचा प्याला घेऊन जीवनाकडे तासन् तास शांतपणे पाहणारा फ्रेंचमन अन्यत्र आढळत नाही. पॅरिस हे रात्री फुलते. सीन नदीच्या काठी चिमुकली पुस्तकांची दुकाने आहेत. हे एक पॅरिसचे पुरातन वैशिष्ट्य आहे.

(५५) पॅरिसमधल्या इमारती आणि प्रदर्शने - पॅरिसमध्ये युनेस्कोची प्रचंड इमारत आहे. एखादे सिमेंट काँक्रीटचे जंगीच्या जंगी तिपाई प्लँचेट असावे, अशा स्वरुपाचा ह्या इमारतीचा आकार आहे. पुढल्या पटांगणात आर्थर मूरने केलेला एक अगम्य पुतळा आहे. युनेस्कोची इमारत म्हणजे नाना देशांतील नाना लोकांचे एक प्रदर्शन आहे. पु. लं. ना मात्र ही इमारत विशेष आवडली नाही. 'नॅचरल ग्रेन्स' चे सौंदर्य पु. लं. ना भावले नाही. नव्या शिल्पातले, चित्रकलेतले पु. लं. ना काही कळत नाही. पु. लं. नी पॅरिसमध्ये अनेक प्रदर्शने पाहिली. चित्रकला, मूर्तिकला प्रदर्शनच नव्हे, तर नादिकशास्त्रापासून ते केशभूषा आणि वेषभूषा प्रदर्शनापर्यंत शेकडो प्रदर्शने, अजबखाने आणि संग्राहलये यांनी पॅरिस शहर गजबजले आहे. पॅरिसमध्ये आयफेल टॉवर प्रसिद्ध आहे. त्याचे दर्शन संध्यासमयी घेतले तर अंत:करणाला स्पर्श करून जाते. आयफेल टॉवर गगनाशी हातमिळवणी करीत असल्याचे वाटते.

(५६) फ्रेंच हॉटेल्स आणि वेटर - पॅरिसमधल्या हॉटेलात वेटर ग्राहकाच्या पुढ्यात खाण्याचा पदार्थ आणून ठेवतो तो देखील अशा थाटात की, बशीत जणू काय जडावाचे दागिनेच आणले आहेत. फ्रेंच माणूस पदार्थ आधी डोळ्यांनी खातो आणि मग जिभेने! काही मोठ्या हॉटेलात ग्राहकांना 'ट्राऊट' सारखे जिवंत मासे दाखवितात. पसंतीनुसार मग वेटर

Scanned by CamScanner

तलवारीच्या पात्यासारखा लपकत ती बशी ग्राहकांपुढे ठेवतो. रिकामी बशी नेताना देखील वेटर लपकत जात असतो. फ्रेंच वेटर अतिशय तत्पर असतो. त्याच्या स्वागताने आणि स्वादिष्ट, सुंदर फ्रेंच जेवणाच्या दर्शनाने ग्राहक विरघळून जातात. फ्रेंच हॉटेल्समध्ये वेटर्स चालत नाहीत, तरंगतात. पण हे लपकणे पुरुष वेटर्सनाच जमते. वेट्रेसिस मात्र ते नर्तन करीत वाढीत नाहीत.

(५७) रतिरंगरंगी रंगलेले पॅरिस - दुपारच्या जेवणानंतर फ्रेंच माणूस रंगायला लागतो आणि मग पॅरिसची संध्याकाळ उमलते. पेयागारे तुडुंब भरतात, निशागारे फुलतात नाईट क्लब्जमध्ये गर्दी दाटते. लिडोसारख्या प्रचंड नाईट क्लबपासून ते नुसते तंबू उभे करून त्यांत नाचकाम करणाऱ्या पोरींचे उत्तान हावभाव दाखवणाऱ्या 'सस्तेमे ऐष' करणाऱ्या करमणुकीपर्यंत सगळ्यांची गिऱ्हाइकी दाटू लागते. रंगभूमीवरची दृश्ये पाहून प्रेक्षक थक्क होतात. काही ठिकाणी 'नग्न नृत्य' चालतात पण अश्लील म्हणता येणार नाही. नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत यांची विलक्षण जादू प्रेक्षकांना थक्क करून सोडते. नाईट क्लबमध्ये पाण्यासारखे पैसे उधळले जातात. 'टिप्स' हा प्रकार मात्र पॅरिसमध्ये भयंकर आहे.

(५८) पॅरिसमधील नाटके - भाषेच्या अडचणीमुळे पॅरिसमध्ये पु. लं. नी फारसी नाटके पाहिली नाहीत पण जी पाहिली ती ते जन्मात विसरू शकणार नाहीत. पॅरिसमध्ये 'पॅले-द-शाय्यो' हे प्रचंड नाट्यगृह आहे. अडीच-तीन हजार प्रेक्षकांची बसण्याची तेथे व्यवस्था आहे. या थिएटरात पु. लं. नी 'लॉरिझॅशिओ' नावाचे ऐतिहासिक नाटक पाहिले. या नाटकातील नायकाचा आवाज थक्क करणारा होता. मायक्रोफोन नव्हता, तरीही ते प्रचंड नाट्यगृह या नटाच्या आवाजाने दुमदुमून जाईल की काय असे वाटत होते. 'डायरी ऑफ ॲन फ्रँक' ची फ्रेंच आवृत्ती पु. लं. ना पॅरिसमध्येच पाहायला मिळाली. या नाटकात ॲन ची भूमिका करणाऱ्या पोरीने प्रेक्षकांच्या काळजाचे पाणी केले. त्यानंतर काही दिवसांनी पु. लं. ना मार्सेल मार्सोंचा मूळाभिनय पाहायला मिळाला. तोंडातून एक शब्दही न बोलता मार्सोंने तीन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवले. 'माईसं' हे फ्रेंचांचे वैशिष्ट्य आहे.

(५९) पॅरिसमधला हिमसेक - पॅरिसमध्ये थंडीचा कडाका वाढत होता. पण व्यवहार थंडावले नव्हते. पु. लं. चे मित्र प्रो. आंबेकर सोरबॉं विद्यापीठात उच्च शिक्षण घेत होते. त्यांनी पु. लं. ना विद्यार्थीगृहात जेवायचे निमंत्रण दिले. जेवण आटोपून पु. ल. हॉलच्या बाहेर आले तेव्हा बाहेर प्रचंड हिमवृष्टी चालू होती. पु. लं. ना पहिल्यांदाच हिमसेक पाहायला मिळाले. सर्वत्र पांढरीशुभ्र जादू पसरली होती. तासभरात हिमाचे थर साचले होते आणि कापसासारखे हिम पडत होते. भोजनगृहातून बाहेर पडणाऱ्या तरुण-तरुणींनी हिमाच्या गोळ्यांची फेकाफेक सुरू केली. या हिमसंग्रामात पु. लं. नीही भाग घेतला होता. रात्री दोन-अडीच वाजेपर्यंत हिमवृष्टीचा स्वागतोत्सव पु. लं. नी साजरा केला.

(६०) प्रदर्शने पाहण्याचा सपाटा - पॅरिसमधल्या शेवटच्या मुक्कामात पु. लं. नी प्रदर्शने पाहण्याचा सपाटा लावला. या प्रदर्शनात चित्रकला, मूर्तिकला पु. लं. ना पाहता आली. मोनालिसाचे सुप्रसिद्ध चित्र पु. लं. ना पाहायला मिळाले. खरे तर चित्रातले पु. लं. ना फारसे कळत नाही. एका प्रदर्शनाने मात्र पु. लं. चे अंत:करण हेलावले. नेपोलियनच्या समाधीजवळ नेपोलियनच्या वस्तूंचा संग्रह आहे. तत्कालीन पोशाख, शस्त्रसामग्रीचे प्रदर्शन पु. लं. ना पाहायला मिळाले. या प्रदर्शनात नेपोलियनची शय्या होती. लहानसा पलंग, मच्छरदाणी, गादी-उशी-पलंगपोस व्यवस्थित ठेवले होते. नेपोलियनची समाधी भव्य आहे. समाधीजवळचे दृश्य गंभीर आहे, मनाला चटका लावणारे आहे. सम्राट नेपोलियनच्या थडग्याला 'चिमण्या शिलेदाराची कबर' म्हणतात..हे नाव अंत:करण हलवून टाकते. फ्रेंचांचे नेपोलियनवर अपार प्रेम आहे.

(६१) पॅरिसचा निरोप - पॅरिसमध्ये पु. ल. दोन महिने राहिले. दोन महिने कसे गेले ते त्यांना कळले नाही. परतीच्या प्रवासाचे वेध त्यांना लागले. कॅसिमो, लिडो यासारख्या करमणुकीच्या आकर्षणापेक्षा पु. लं. ना पॅरिस शहराचे आणि फ्रेंच माणसाचे आकर्षण होते. भाषेचे अज्ञान सोडल्यास पॅरिस शहरात राहण्याचे परकेपण पु. लं. ना वाटले नाही. पॅरिस सोडताना मात्र पु. ल. मनातून दुखावले होते. "एखाद्या सुंदर कादंबरीची पहिली आणि शेवटली पाने सुटून हरवली असावी आणि हाती आलेल्या मधल्या मधल्या प्रकरणांनी चटक लावावी", तशी चटक पॅरिस शहराने पु. लं. ना लावली.

पॅरिसहून विमानाने पु. ल. लंडन ला आले. लंडनच्या विमानतळावर दाट धुक्यामुळे विमान उतरले नाही, लंडनपासून दूर असलेल्या गॅटविकच्या विमानतळावर विमान उतरले. गॅटविक करून आगगाडीने पु. ल. दोन अडीच तासांचे अंतर कापून लंडनला आले. पु. ल. ज्या विमानाने गॅटविकला उतरले त्याच्या एक तासानंतर तुर्कस्तानी शिष्टमंडळाचे विमान गॅटविक एअरपोर्टवर कोसळले. दोन चार माणसे सोडून बाकीची जागच्या जागी ठार झाली. रात्री टेलिव्हिजनवर बातमी ऐकून पु. लं. ची छाती धडधडली. पु. लं. जेव्हा परदेश दौऱ्यावर निघाले तेव्हा पु. लं. च्या एका भाबड्या हितचिंतकाने (रत्नागिरीचे अंतू बर्वा यांनी विश्वेश्वराच्या अंगाऱ्याची पुडी दिली होती.) पु. लं. च्या सुटाच्या खिशात देवाच्या अंगाऱ्याची पुडी टाकली होती. पु. लं. ना या गोष्टीची आठवण झाली.

(६२) परतीच्या प्रवासाची तयारी - पॅरिसहून लंडनला आल्यानंतर पु. लं. ना तीनचार दिवसात परदेशचा मुक्काम आवरावा लागणार होता. मुंबईहून पु. ल. लंडनला विमानाने आले होते. जलपर्यटनाची हौस तेव्हा भागली नव्हती. आता परतीच्या वेळेस बोटीतून प्रवास करायचा असे पु. लं. नी ठरविले. हिंदुस्थानला जाताना कोणकोणत्या वस्तू नेता येतील याची चौकशी पु. लं. नी इंग्लंडमधल्या भारतीय वकिलातीत केली. 'काहीही नेता येणार नाही' असे उत्तर पु. लं. ना मिळाले. पु. लं. ना इतर वस्तूंचे आकर्षण नव्हते पण जर्मनीत घेतलेल्या कॅमेराचे आकर्षण होते. गॅटविक एअरपोर्टवर कस्टम अधिकाऱ्यांने त्या कॅमेराला दोन तीन मिनीटे हातात खेळविले व पु. लं. ना परत दिले होते. क्षणभर पु. ल. अस्वस्थ झाले होते.

पी. अँड ओ. कंपनीच्या बोटीवर आधी पाठवायच्या सामानाची लेबले चिकटवण्याचे काम सुरू झाले. बोटीने नवीन फ्रीज नेता येत नव्हते. वर्षभर वापरलेला फ्रीज नेता येत होता. पु. लं. नी फ्रीज नेण्याचा नाद सोडून दिला. लंडनमधल्या नव्हे, परदेशातल्याच मुक्कामातला पु. लं. चा शेवटचा दिवस होता. ट्रंका बोटीवर पोचल्या होत्या.

(६३) साउदँप्टन बंदरावरची कँटन बोट - टॅक्सीने साउदँप्टन बंदरावर आले. पु. लं. ना रेल्वे प्लॅटफार्मपेक्षा बंदर अधिक आवडते. बंदरात बोट उभी होती. कस्टम अधिकाऱ्यांनी

Scanned by CamScanner

काहीही न विचारता मामानावर खडूने फुल्या मारल्या. पु. लं. ना त्यांची कॅबिन शोधून काढायला अर्धा तास लागला. पु. ल. कॅबिनचा ताबा घेऊन बोटीच्या डेकवर आले. एकमेकांना निरोप देणे, आलिंगन देणे-घेणे सुरू होते. काहीजण फोटो काढत होते. पु. लं. नी साउदँप्टन बंदराचा फोटो काढला. थोड्यावेळाने गगनभेदी भोंगा वाजला. कँटन बोट इंग्लंडच्या किनाऱ्यापासून दूर सरकू लागली. बोटीने हिंदी प्रवासी प्रवास करीत होते परंतु सगळेच एकमेकांना परके होते.

(६४) आणि माणसे बदलायला लागली - पु. लं. ना हिंदुस्थानची ओढ वाटू लागली. इंग्लंडची बोट हिंदुस्थानच्या दिशेला सरकू लागली. चौदा पंधरा दिवसाचा प्रवास सोबत करायचा होता. ओळखी वाढायला लागल्या. विलायतेत शिक्षणासाठी राहिलेले तरुण घोळक्यांनी डेकवर गाऊ लागले. दिवसभर इंग्रजी पोरींशी दोस्ती करून गंमत करणारा महेश हिंदी, बंगाली भजने गाऊ लागला. भट्टाचार्य, मूर्ती, कामत, पंथुलू, देशपांडे अशी विसंवादी वाटणारी नावे एकत्र जेवू-खाऊ लागली. पु. लं. च्या सुदैवाने त्यांना पियानो वाजवायला मिळाला.

(६५) जिब्राल्टरची सामुद्रधुनी - कँटन बोट जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीत शिरली. पण या जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीने भलताच इंगा दाखवला. सगळ्यांनी अंथरुणे धरली. उगीचच बोटीच्या प्रवासाला निघालो, असे पु. लं. ना वाटत होते. बोट इतकी हलत होती की पोटात पाणी ठरत नव्हते. दिवसभर उशीला नाक लावून पडायचे काम पडले. थोडी मान वर केली तरी उलटी होत असे. हा प्रकार तीनएक दिवस चालला. हळूहळू बोट ठिकाणावर आली आणि नाकासमोर चालू लागली. सर्व माणसे आपापल्या कॅबिन्समधून बाहेर पडली. जो तो आपल्याला बोट लागली नाही, हे पटवून देत होता.

बोटीच्या प्रवासाला खरी सुरुवात झाली ती जिब्राल्टर नंतर!

(६६) बोटीवरचे सामुदायिक खेळ - बोटीवरचा प्रवास सुरू होता. हवेतला झोंबणारा गारवा कमी होऊ लागला. कुणी पत्त्यांचे डाव मांडीत होते. पुढे बोटीवर सामुदायिक खेळ सुरू झाले. भिंतीवर लावलेल्या चक्रावर बाण मारण्याचा डार्ट्सचा खेळ सुरू झाला. पु. लं. ना मात्र त्यात यश मिळाले नाही. फॅन्सीड्रेसमध्ये मूर्ती नावाच्या तरुणाच्या गळ्यात आणि कमरेला संत्रा मुसंब्यांच्या रुंडमाळा घातल्या. इंग्लिश पोरीचा झगा त्याला चढविला. लिपस्टिक अंगभर ओठून घेतले होते. डोक्याला साईबाबांसारखा रुमाल बांधून दिले होते. त्याला बक्षिस म्हणून दोन शँपेनच्या बाटल्या देण्यात आल्या.

(६७) मृत समुद्र ते पोर्ट सैद - बोट चालत होती. कोणत्याही बंदराला बोट लागली नव्हती. काही मंडळी डेकवर आली होती. पु. लं. ना एके दिवशी समुद्राचे एक अलौकिक स्वरुप पाहायला मिळाले. हा अफाट समुद्र मेल्यासारखा पडला होता. पापलेटाच्या रंगाचा हा समुद्र पापलेटाच्या पाठीसारखाच गुळगुळीत आणि निश्चल होता. तरंग बिल्कुल नव्हते. पु. लं. ना हा समुद्र मृत वाटत होता. मासेही दिसत नव्हते.

वातावरणात उकाडा वाढला होता. पोर्ट सैद जवळ येऊ लागले, घामाच्या धारा वाहू लागल्या. बोट पोर्ट सैदला आली. फिरते दुकानदार दुकाने घेऊन घोंघावू लागले. लहान-लहान होडक्यामधून नाना प्रकारच्या वस्तू विक्रीला ठेवल्या होत्या.

(६८) सुवेझ कालवा ते एडन - पोर्ट सैदला झालेल्या खरेदीच्या गोष्टी सुरू असतानाच बोटीने सुवेझ कालव्यात प्रवेश केला. सुवेझ कालवा लहान असेल, याची पु. लं. ना कल्पना नव्हती. बोटीपुढे एक छोटी 'पायलट' असते. ती ह्या बोटीला ओढीत नेते. सुवेझ कालवा विमानातून सुतळीच्या तोड्याएवढा दिसतो. सुवेझ कालव्यातून एडनपर्यंत आठ-दहा तासांचा प्रवास होता. सुवेझ कालव्याच्या दोन्ही बाजूला खजुराची झाडे होती. शेळ्या चारणारी अरबांची पोरे आणि डोक्यावर उंच सुरया घेतलेल्या मिसर सुंदरी लक्ष वेधून घेत होत्या.

बोट एडनला आली. एडनला मुक्काम होता. एडनमध्ये वस्तू भलत्याच स्वस्त मिळतात म्हणून लोक वस्तू घ्यायला धावतात. पु. ल. ही खरेदीसाठी गेले. मुसलमानांचे रोझे सुरू असल्यामुळे बहुतेक दुकाने दिवसा बंद होती. हिंदी व्यापाऱ्यांची दुकाने उघडी होती. पु. ल. ना एडनमध्ये पान खायला मिळाले. इंग्लंडमध्ये त्यांना पान मिळाले नव्हते.

(६९) आणि अखेर मुंबई आली - एडन बंदरातून बोट निघाली. चार दिवसाचा प्रवास उरला होता. सामानाची आवराआवर, सहप्रवाशांशी पत्त्यांची देवघेव हे कार्यक्रम सुरू झाले. कस्टममधून कुठला माल सुटेल आणि कुठे कर भरावा लागेल, याच्याही चर्चा सुरू झाल्या. निराळे फॉर्म भरणे सुरू झाले. रात्री चंद्राला साक्षी ठेवून बोट मुंबई बंदराजवळ आली. एकाएकी क्षितिजावर लक्ष दीप उजळले आणि डेकवर 'मुंबई मुंबई' करीत आरडाओरडा झाला. सोबतीचे प्रवासी भारावले होते. काहींच्या डोळ्यांतून टिपे आली. रात्रीचे अकरा वाजले होते. बंदरातून कस्टमची बोट आली. अधिकारी लोक बोटीवर आले. पहाटेशिवाय बोटीला बंदरात उतरायला परवानगी नव्हती. बहुतेकांनी सारी रात्र बोटीवर जागून काढली. पहाट होताच बोटीचा जिना बंदराला लागला. पु. लं. च्या आप्तेष्ट मित्रांनी धक्क्यावर दाटी केली. कस्टम अधिकाऱ्यांच्या तावडीतून सुटका झाल्यानंतर पु. लं. नी घर गाठले.

(७०) अपूर्वाई संपली - पु. लं. ना दुपारी कचेरीत जाऊन हजेरी लावायची होती. इंग्लंडच्या कथा ऐकायला जमलेल्या मित्रांशी संध्याकाळचा वायदा पु. लं. नी केला. भोजन उरकले आणि पु. लं. नी बसचा नाका गाठला. पहिलीच 'ओ टू एक्सप्रेस' 'जगा नही - नीचे उतरो' म्हणत ठणठणून पुढे गेली. आणि पु. लं. मनात म्हणाले, "चला, पश्चिमेच्या सायंताऱ्यासारखी डोळे भरून पाहता पाहता मावळणारी अपूर्वाई संपली..... पूर्वायुष्य सुरू झाले."

प्रश्नोत्तरे

प्रश्न १ ला - 'अपूर्वाई' या पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनाची वैशिष्ट्ये विशद करा.

किंवा

'प्रवासवर्णन' म्हणून अपूर्वाईचे वेगळेपण स्पष्ट करा.

उत्तर - पु. ल. देशपांडे यांचे 'अपूर्वाई' हे प्रवासवर्णन १९६० साली प्रसिद्ध झाले. **'अपूर्वाई' चे** वेगळेपण अपूर्वाईच्या यशातच दडले आहे. 'अपूर्वाई'च्या जून ९७ पर्यंत १४ आवृत्त्या निघाल्या आहेत. **यावरून** 'अपूर्वाई' कितीं वाचकप्रिय आहे, हे लक्षात येते. तसा मराठी वाङ्मय प्रकारात **'प्रवासवर्णन'** हा प्रकार कथा-कादंबरी-नाटक या प्रकाराइतका लोकप्रिय

Scanned by CamScanner

नाही. तरीही मराठीत काही लेखकांनी या लेखनप्रकाराला लोकप्रिय केले आहे. विशेषत: विनोदी लेखकांची प्रवासवर्णने अतिशय लोकप्रिय आहेत. गंगाधर गाडगीळ, रमेश मंत्री या लेखकांचे प्रवासवर्णन वाचनीय असते. त्यात मजेदार किस्स्यांचा अंतर्भाव असल्यामुळे विनोदी लेखकांची प्रवासवर्णने वाचकांना आवडतात. डॉ. यशवंत मनोहर यांचे 'स्मरणाची कारंजी' हे प्रवासवर्णन प्रसिद्ध आहे. भारतातील दक्षिणप्रांतांचे प्रवासवर्णन त्यात आहे. दलित साहित्यिकांनी लिहिलेले हे प्रवासवर्णन वेगळे वाटते.

पु. ल. देशपांडे हे विनोदी लेखक असल्यामुळे विनोदाच्या चष्म्यातूनच ते समाजाकडे पाहतात, असा समज असतो. पु. ल. जेव्हा एखादी घटना गंभीरपणे लिहितात तरी ती विनोदी शैली होऊन जाते. पु. लं. नी आयुष्यात प्रवासवर्णन आणि आत्मचरित्र लिहायचे नाही असे ठरविले होते परंतु 'अपूर्वाई' या पुस्तकात पु. लं. चे हे दोन्ही संकल्प मोडल्या गेले आहेत. प्रवासवर्णन ह्या गोष्टीची प्रत्यक्ष प्रवासापेक्षाही पु. लं. नी अधिक धास्ती घेतली आहे. 'अपूर्वाई' मध्ये प्रवासाचे वर्णन नसून प्रवासात असलेल्या पु. लं. चे वर्णन अधिक आहे. अपूर्वाईच्या पाचव्या आवृत्तीत पु. लं. लिहितात, "प्रवासवर्णने ही प्रतिबिंबे असतात. तसे पाहिले तर सारे ललित साहित्य जीवनाच्या प्रवासात वेगवेगळ्या वातावरणात वाढलेल्या संवेदनशील लेखकांच्या मनावर उमटणाऱ्या प्रतिबिंबातूनच जन्म घेत असते. मी हा प्रवास केला त्याच काळात ह्या देशांचा प्रवास करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या लेखकाने ह्याच यात्रेची कहाणी निराळ्या रीतीने सांगितली असती." पु. ल. 'अपूर्वाई'तल्या घटनांकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून बघत नाहीत, ते आत्मनिष्ठ दृष्टिकोनातून बघतात. परदेशात जाऊनही पु. लं. चे मन भारतीय आहे, याचे आत्मभान त्यांना सतत असते, हे 'अपूर्वाई'चे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.

आता युरोपचा प्रवास ही अपूर्वाई राहिलेली नाही. 'अपूर्वाई'तल्या स्थळांविषयीच्या माहितीपेक्षा वाचकाला रुचते ती लेखकाला भासलेली अपूर्वाई; हे अपूर्वाईचे यश आहे. पु. लं. नी परदेशातल्या दौऱ्याच्या वेळेस अनेक शहरांना भेटी दिल्या, अनेक नाटके पाहिली. माणसांचे चेहरे पाहिले, स्वभाव पाहिले, निसर्ग पाहिला. पु. लं. चे प्रवासवर्णन हे पुस्तक केवळ प्रवासवर्णन वाटत नाही; ते ललितलेखन वाटते. 'अपूर्वाई'तील लेखन रुक्ष वाटत नाही. वाचकाला नवनवीन माहिती सांगून गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य पु. ल. च्या लेखनशैलीत आहे. संपूर्ण पुस्तकात पु. ल. आपल्याला वेळोवेळी भेटतात तेव्हा पु. लं. चा सामान्यपणा

लिहिले आहे. नातेवाईक, मित्रमंडळी, पु. लं. च्या पत्नी या सर्वांशी पु. लं. ना कसकसे तोंड द्यावे लागले, हा भाग आहे. इंजेक्शनप्रकरणाची पु. लं. नी अतिशय धास्तीच घेतली होती. विमान प्रवासाची पु. लं. ना भिती नव्हती. पण आंतरराष्ट्रीय परिस्थिती बिघडली असती तर पु. लं. चा प्रवासदौरा धोक्यात येणार होता. पायमोजे, रेझर, टोपी या गोष्टीही पु. लं. ना महत्त्वाच्या वाटत होत्या. या साऱ्या वर्णनाने वाचकांना पु. लं. च्या पुढच्या यात्रावर्णनाची उत्सुकता वाटत राहते. विमानतळावर आधीपासून जाणे, विमानाला उशीर होणे, पु. लं. ना व्ही.आय.पी. समजणे, नातेवाईक मित्रमंडळींची वर्दळ, कस्टम अधिकारी यांचे वर्णन वाचकांना सतत हसवित राहते.

(२) विनोदी शैली - पु. लं. च्या 'अपूर्वाई' या प्रवासवर्णनात सबंध पुस्तकभर विनोदी शैलीचा प्रभाव पडलेला आहे. आणि म्हणूनच वाचकांना सतत आनंद मिळतो. पु. लं. च्या विनोदी शैलीचे काही उतारे लक्षणीय आहेत. उदा. (१) शिंप्याने सूट शिवल्यानंतर पु. ल. सूट घालून पाहतात तेव्हा सूट घालून लंडनमध्ये फिरा - तुम्हाला मरण नाही असे शिंपी म्हणतो तेव्हा पु. लं. लिहितात, "अर्धसहस्र रुपयांनी माझा जुना खिसा रिकामा केल्यावर त्याच्या आत्म्याची शांती झाली आणि एकदाचा मी 'सुट' लो." (२) "मी माझी काही पुस्तके घेतली होती - इंग्रजांना वाचून दाखवण्यासाठी नव्हे, तर मी लेखक असल्याचा काही पुरावा असावा, एवढाच नम्र हेतू!" (३) "परवा परवा रशियाने चंद्रावर कुत्री सोडल्याची खबर वाचली होती. त्या बिचारीने रशियाचे काय घोडे मारले देव जाणे!" (४) "लिफ्टवाल्याप्रमाणे मला मोठ्या हॉटेलातल्या वेटर्सचेदेखील भारी भय वाटते. बाजूला तो उभा असला की माझ्या हातून नेमका चहा सांडतो. मला मास्तरांची कधीच भीती वाटली नाही. मास्तरणींना मी भितो आणि डॉक्टर्सच्या तर माझे ऑपरेशन चालू असताना मी गळ्यात गळा घालून गाणे म्हणेन, पण नर्सला बिल देताना देखील माझा हात थरथरतो! अशा या भलभलत्या वेळी माझे ऊर का धपापते कोण जाणे!" (५) "इंग्रजांनी संग्रहालयातल्या प्राण्यांना देखील जेवताना ब्रिटिश शिष्टाचार शिकवले आहेत की काय, ते पाहण्याची उत्सुकता होतीच - मागल्या दोन पायांवर नॅपकिन ठेवून सिंहमहाराज टोमॅटो सूप भुरकीत आहेत, गजराज सोंडेने क्रीम क्रॅकर मोडताहेत, वाघ उकडलेले अंडे सुरीने कापताहेत, कोल्हा आपले एग अँड बेकन खाऊन उंटाच्या पावावर डोळा ठेवून आहे, लांडगा कॉफीची बाट पाहतो[illegible]

Scanned by CamScanner

पु. लं. नी त्या टॉवेलचा सद्उपयोग केला. पु. लं. नी स्वतःचे अडाणीपण बिल्कुल लपविले नसल्यामुळे वाचकांना विनोदाचा भास होतो.

(७) भाषाशैली - 'अपूर्वाई'चे यश पु. लं. च्या भाषाशैलीतही दडले आहे. पु. लं. च्या भाषेला सौष्ठवपणा आहे. अधूनमधून संस्कृतचा वापर दिसतो. भाषाशैलीचा प्रभाव वाचकांना पु. लं. च्या काही ठशीव वाक्यातून आढळतो. अशी काही वाक्ये पाहू या.

(१) "मी टॉवेल घेतला आणि तिची अधिक प्रेक्षणीय पाठ फिरल्यावर आजूबाजूला पाहिले."

(२) "आमचे ते प्रचंड विमान त्या महान अंधार देशोदेशींच्या डोंगरांच्या आणि समुद्रांच्या माथ्यावरून वाट काढीत होते. भूगोलाच्या प्रश्नपत्रिकेतले माझे सारे शत्रू त्या अंधाराखाली चेपले गेले होते."

(३) "खाली आकाश आणि वर आकाश अशा अवस्थेत विमानातून ढगांच्याहीवरून जात असताना जीवनासंबंधी विचार करण्याच्या दृष्टिकोणात इच्छा असली नसली तरी फरक होतो!"

(४) "विचारदेखील विकारांप्रमाणेच कालांतराने गुंगी आणतात."

(५) "क्षणाक्षणाला अज्ञानाच्या वाळवंटाचा विस्तार वाढताना दिसत होता."

(६) "पाश्चात्य देशांतल्या साऱ्या मोठमोठ्या कंपन्यांच्या ह्या सेक्रेटरी म्हणून राबणाऱ्या पोरी जणू रक्तवाहिन्या आहेत."

(७) "लंडनमधल्या त्या प्राणिसंग्रहालयातली ती गाय मला भलती करूण वाटली- बंदिस्त देवकीसारखी!"

(८) "चारी बाजूला मुक्त यौवन फुलले आहे आणि जाणते वार्धक्य शांतपणे आपल्या ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या आसनावर अधिष्ठित होऊन त्याला आकार देण्याचा प्रयत्न करते आहे."

(९) "दुसऱ्या महायुध्दाने माणसाला जेवून उठण्याऐवजी उठून जेवायला लावले."

(१०) "पॅरिसच्या कॅसिनोत एका तालात पाय उडवणाऱ्या पोरींसारख्या माशांच्या टोळ्यांच्या टोळ्या पाण्यावरून एका तालात उड्या मारून जात."

अशी वाक्ये पुस्तकाभर आढळतात आणि पु. लं. च्या उत्तम भाषा शैलीचा परिचय वाचकांना होतो.

एकंदरित 'अपूर्वाई' वाचकांचे लक्ष वेधून घेणारे पुस्तक आहे. काही जुजबी दोषही आढळून येतात. पु. लं. सोबत परदेशच्या दौऱ्यात त्यांच्या पत्नी देखील होत्या. त्यांचा संदर्भ अपवादात्मकच येतो. जणू पु. ल. एकटेच परदेश दौऱ्यावर गेले होते की काय असे वाटण्या इतपत पु. लं. पुस्तकभर संचार करतात. पु. लं. ना नाटकाचे वेड आहे. त्यांनी वेड्यासारखी नाटके पाहिली. त्याचे वर्णन जरा जास्तच झाले असे वाटते. परतीचा प्रवास लवकर गुंडाळल्यासारखा वाटतो. असो, पु. लं. नी आत्मनिष्ठ दृष्टिकोनातून अपूर्वाई लिहिली आहे. पु. लं. ची ही अपूर्वाई वाचकांना वेगळी लज्जत देणारी ठरली आहे. यात शंका नाही.

■■■

Scanned by CamScanner